# माणूस

शनिवार । ४ ऑक्टोबर १९८० । एक रुपया


## ‘आक्रोश’ चित्रपटातला....

पृष्ठ....४

# आदिवासी

## ....धुळे जिल्ह्यातील एका गावातला

पृष्ठ....३

## शिवाय


जयप्रकाशजींची
शैक्षणिक संकल्पना :
एक पुनरावलोकन पृष्ठ...६

# गणेशोत्सव : एक रिलीफ

रमण देशपांडे

गणेशोत्सव, एक चावून चावून चोथा झालेला अनाकलनीय तरी पण कुठे तरी मनाला गवसणी घालणारा विषय झाला आहे. लो. टिळक ते वाचकांचा पत्रव्यवहार, मनुस्मृती, याज्ञवाल्क्यस्मृती, बृहदारण्यक ते मनोहर, श्री याची कव्हरस्टोरी इथपर्यंत, शंकराचार्य ते अनिल अवचट या वेगवेगळ्या पातळ्यांवरून, थरांमधून पुरेशी चर्चा होऊनही पुण्या-मुंबईच्या गणेशोत्सवावर फारसा परिणाम झालेला नाही. 'मूळ हेतू चागला—आजचे स्वरूप हिडिस, देव मनात असतो—एवढा भपका कशाला??' इत्यादी वाद झाले व होताहेत; पण जनमानसातील गणपतीची प्रतिमा, स्वरूप, स्थान व पुढची सगळी वाटचाल कायम आहे. दरवर्षी मडळे वाढत आहेत, मिरवणूक लांबत आहे; शांतता-कमिटी, उत्सवकमिटी, सस्थानकमिटी, औषधकमिटी इत्यादि कमिटया वाढताहेत; बाहेरगावाहून येणारा लोढा वाढतोय, रोषणाई वाढतेय, खर्च वाढतोय ! जातीय दंगे होवोत, भाव-वाढ होवो अगर मुसळधार पाऊस पडो; पण नाही – गणेशोत्सव होणार तो होणारच आणि केवळ दरवर्षीप्रमाणे – *सालाबादप्रमाणे नव्हे, तर प्रत्येक वर्षी दुप्पट* उत्साहाने तो साजरा होणार !

सुमारे दोन वर्षांपूर्वी पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघटनेत मी असताना आम्ही गणपतिप्रदर्शन भरवले. आदिम साम्यवादी अवस्थेतील गणव्यवस्था ते लो. टिळकांचा गणेशोत्सव—जनजागरणाचे एक प्रतीक इथपर्यंत ऐतिहासिक आढावा घेण्याचा प्रयत्न केला. गणप्रधान समाजव्यवस्थेतील नायक — मग विघ्नकर्ता, शूद्रांचा देव ते परत त्याचा हिंदुसंस्कृतीतील सन्माननीय प्रवेश, निरनिराळ्या देशातील गणपतीची संकल्पना व राष्ट्रीय चळवळीतील स्थान इ. बाबी या प्रदर्शनात होत्या. गणपती या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करून जी स्थित्यंतरे घडत गेली, उदाहरणार्थ जातिव्यवस्था, मूल्यसंक्रमण, नीति-संकल्पना, सामाजिक अभिसरण, वर्गीय तणाव इत्यादी घटनांचा आलेख प्रदर्शनात मांडला.

हे सर्व करताना आमचा हेतू हा होता की, गणेशोत्सवाचे वरपांगी हिडिस स्वरूप, मूळ संकल्पना यातील अंतर्विरोध जनसामान्यासमोर मांडला तर कदाचित हा अपेक्षित बदल होईल; पण प्रदर्शनावर हल्ला झाला, ते जाळायचा प्रयत्न झाला. या गोष्टी *वैयक्तिक अनुभव म्हणून दूर सारल्या तरी* अनेकानी अनेक प्रकारच्या सूचना करूनही हे स्वरूप, ही गर्दी आणि हे आकर्षण कायम रहाते असेच दिसतेय आणि म्हणूनच कुतूहलापोटी दुसऱ्या बाजूचा विचार करणेही अपरिहार्य ठरते.

अजूनही एवढ्या उत्साहात गणेशोत्सव का होतात ? लोक वर्गणी का देतात ? देवाला नैवेद्य अर्पण करायला व श्रींचा प्रसाद घ्यायला का धडपडतात ? रात्र रात्र बाहेर का भटकतात ? कार्यकर्ते एवढी ढोर मेहनत का घेतात आणि सरतेशेवटी प्रचंड गैरसोय, मनस्ताप होऊनही सतत रात्र रात्र का नाचतात ? का नाच बघतात ? हे सगळे केवळ गणेशाच्या श्रद्धेपोटी होते का ? नेमके काय या गणेशोत्सवात साध्य होते ? काही तरी साध्य होते, काही तरी मिळते म्हणूनच तर एवढ्या कष्ट-खर्चानेही हा जल्लोष लोक करतात. विसर्जनानंतरही कोणीच खिन्न-उदास नसतो असेच दिसते. गणेशोत्सव—एक हंगामा असे त्याचे स्वरूप आहे; तरी पण फक्त पोरींना धक्के मारायला, रात्री बाहेर पडायला मिळते म्हणून किंवा 'बाटली' टाकायला, सर्व लोक फिरत नाहीत, कष्ट करून घेत नाहीत आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गणेशोत्सव ही काही लादलेली सक्ती नाही, केवळ धार्मिक आचारही नाही. या ना त्या स्वरूपात वैयक्तिक माणसाची, समूहाची, समुदायाची, समाजाची गरज गणेशोत्सवात भागवली जाते का? काही तरी दिलासा, समाधान, सुख लोकांना मिळते का ? या प्रश्नांच्या मुळाशी जसेजसे जावे तसतसे हे कोडे उलगडू लागते, गोंधळ थोड्या प्रमाणातात दूर होऊ लागतो.

*अर्थातच* ही दुसरी बाजू बघताना केवळ 'अनंत-चतुर्दशी' या विसर्जनदिनाच्या मिरव-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : अठरावा
४ ऑक्टोबर १९८०
किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

णुकीचे स्वरूपही बाब वरवरची ठरते. गणेश-चतुर्थीच्या महिनाभर आधीपासून बैठका होतात, कार्यक्रम ठरतात, वर्गणी गोळा केली जाते, घरोघर फिरणे होते. नंतर सामान, तयारी, मंडपउभारणी, स्पीकर, रोषणाई, बाबू, वाहतुकीची व्यवस्था, देखरेख, व्यवस्थापन आहेच. रोजचे कार्यक्रम, पूजा-अर्चा, शेवटी पानसुपारीची तयारी, मिरवणुकीसाठी नंबर, लायसेन्स, परवाना तर आवश्यकच ! गुलाल, प्रसाद, वाद्ये व इतर गोष्टीही लक्षपूर्वक केल्या जातात. या सर्व गोष्टी मंडळाचे कार्यकर्ते अत्यंत जबाबदारीने, स्वत:चा पैसा खर्च करून, रजा टाकून, शारीरिक व मानसिक ढोरमेहनत घेऊन करतात आणि मुख्य म्हणजे हे सर्व ते स्वेच्छेने, कुरकूर न करता करतात. परस्पर समजुतीने कामाची वाटणी होते, जबाबदाऱ्या ठरतात व त्या व्यवस्थित पार पडतात. या दिवसातले सगळे वातावरण धामधुमीचे, मजेचे, आनंदाचे, जल्लोषाचे असते. कार्यकर्ते रात्र-रात्र जागतात, लोक मंडळाचा गणपती, सजावट बघताना काय प्रतिक्रिया व्यक्त करतात याकडे लक्ष देतात. वेळप्रसंगी अडचण आल्यास 'वाट्टेल ते' करून वेळ मारून नेतात आणि एवढे सगळे करून शेवटच्या दिवशी बेभान होऊन खुल्या दिलाने मरेस्तोवर नाचतात ! दुसऱ्या दिवशी दु:खाची छटा नसते. असे का व्हावे ?

आजच्या रोजच्या जीवनात याचे उत्तर आपल्याला सापडते आज प्रत्येक प्राणिमात्र नोकरी करतो, रोजगारी करतो, शिकतो, घरकाम करतो, पोट भरतो; त्याचे स्वरूप इतके कटकटीचे, यंत्रमय, एकांगी व नीरस झाले आहे की, या सर्व गोष्टी करताना त्यातील कष्ट व श्रम त्याला 'ओझे' वाटू लागतात. नाइलाजास्तव नोकरी, कमी पगार, रजा नाही, प्रमोशन नाही, वशिलेबाजी, बॉसिंग यामुळे त्याच्या दैनंदिन जीवनातील कष्ट त्याला नकोसे होतात. परीक्षा, ट्युटोरियल, टेस्ट, निकालातील गोंधळ; नोकरीची शाश्वती नाही यामुळे शिक्षणाचे ओझे होते. सगळा घरकामाचा भार बहुधा एकटीवर. अपुरे घर, पुरेसा पैसा नाही, वाढत्या गरजा, मुलाची जबाबदारी व प्रत्येकाच्या दु:खाची, वैतागाची धेणेकरी — अशी त्रस्त गृहिणी आणि अशीच सार्वत्रिक दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणे ! दैन्य, बेकारी, विषमता, जाती—पाती, विकासाची संधी नाही, क्षमतेला वाव नाही, केवळ कटकटी या अशा जिण्यातून आजचा दिवस ढकलणे एवढाच मर्यादित हेतू राहतो. 'श्रम करणे ही मूलभूत गरज न राहाता तो एक सामाजिक व्यभिचार वाटतो. सर्वांनी मिळून, कटकटी दूर ठेवून, निरलस व सहजपणे काही श्रम घेऊन निर्मिती करणे ही मानवी जीवनाची मूलभूत गरज आहे व ती दैनंदिन जीवनात कोठेच भागवली जात नाही आणि मग हीच वैयक्तिक गरज, सामूहिकरीत्या भागवण्यासाठी गणेशोत्सवाची हौस होते, ओबड धोबड मार्गाने ती गरज भागवली जाते. दैनंदिन जीवनात जे कधीही घडत नाही — पण जी मानवाची मूलभूत गरज आहे ती गणेशोत्सवात भागवली जाते. सगळे आपणहून राबतात, खस्ता खातात, जबाबदारी घेतात. फारशी शिवीगाळ नाही, कटकट नाही. जात नाही, श्रीमंती नाही, रंग नाही, वर्ण नाही, कशाकशाचा भेदभाव बाळगला जात नाही. स्वयंस्फूर्तपणे हे सर्व केल्याने, ही गरज भागविली जात असल्याने त्याचा विशेष मनस्ताप व गैरसोयही होत नाही आणि म्हणूनच गणेशोत्सव दणक्याने भरभराटीच्या उत्साहाने होतात.

या सर्व प्रकारातील तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे सजावट-रोषणाई, कार्यक्रम या सर्व प्रकारात निर्मितीला, गुणाना; कल्पनाशक्तीला वाव असतो. देवाण-घेवाण, विविधता यामुळे अशी सामुदायिक निर्मितिक्षमता सर्वसामान्य जनतेसमोर मांडली जाऊन, कौतुकाची, पसंतीची, गौरवाची अशी सामुदायिक प्रतिक्रिया निश्चितच निर्भेळ आनंद देते.

स्त्रिया—पुरुष, मुले-बाळे, म्हातारे-कोतारे रात्र—रात्र का भटकतात ? तरुणपिढी कोरसमध्ये गाणे गात, शिट्ट्या मारत, टाळ्या पिटत, टोळक्याने का भटकते ? यालाही असेच कारण आहे कुठेही आजच्या आपल्या समाजात, रोजच्या साचेबंद व धकाधकीच्या जीवनात कुटुंब म्हणून, ग्रुप म्हणून, सामूहिक कृतिद्वारे जल्लोष करण्यास पुरेशी संधी नसते. सर्वांनी मिळून बागडावे, नाचावे, गावे, खावे—प्यावे यात जो एक अवर्णनीय आनंद असतो तो भागवायला वेळ, संधीच मिळत नाही. मुक्तपणे, घरादाराची, रोजच्या कटकटीची, वाढून ठेवलेल्या भविष्याची चिंता न करता 'रात्र' गुजरणे हे काय 'अमानवी' आहे काय ? आणि हेच साध्य होते, स्वैपाकाची कटकट नाही, बाहेर मोकळेपणे फिरता येते, रोजच्या त्याच त्याच प्रश्नांची तड नाही, यामुळे स्त्रियाही सुखावतात. बुभुक्षित नजरा व धक्के हे तसे रोजचे व सरावाचेच होत; पण हा दुसरा आनंद महत्त्वाचा ठरतो.

एकंदरीत काय तर आजच्या बंदिस्त, काटेकोर व कटकटीच्या जीवनात आपले कष्ट, श्रम, दिलासा इ. गोष्टीची किंमत सर्वसामान्य माणूस हरवून बसला आहे. चिंता व द्वेषाने तो त्रस्त आहे. त्याला 'रिलीफ' म्हणून सण, लग्न, पूजा, सहल इ. मार्गही फार अपुरे व मर्यादित ठरल्याने सामूहिकरीत्या आनंद लुटण्याची एक सोय या गणेशोत्सवात होते. सामुदायिक, स्वयंस्फूर्त कष्ट घेतले जातात, लोक हे सर्व बघून कौतुक करतात. नंतर कधी नव्हे त्या एकत्र जल्लोषात सारे विसरून नाचतात, गातात ! एक व्यक्ती व तिचे आसपासचे वातावरण हे दैनंदिन जीवनात प्रचंड प्रमाणात कलुषित होते. यापासून सुस्कारा मिळवण्यासाठी काही तरी स्वैर, स्वयंस्फूर्त, निरपेक्ष पण सामूहिक हवे असते आणि असे मिळवताना थोडे कष्ट, खर्च, गैरसोय झाली तरी त्याची कोणी फिकीर करत नाही आणि म्हणूनच 'गणेशोत्सव' ही एक क्षणिक, तात्पुरती मुक्ती मिळवण्याची कधी ओबडधोबड, कधी केविलवाणी पण मन संतुष्ट करणारी अशी धडपड ठरते. या सर्व गोष्टी घडताना 'श्री' शब्दरूपच राहातात व त्यातला धार्मिक आशयही विरून जातो. एक धार्मिक उत्सव यापेक्षा सामाजिक उत्सव या स्वरूपातच तो साजरा होतो.

या सर्व गोष्टी नजरेखाली घातल्यावर, आणखी खोल गेल्यावर हे पैलू अधिक स्पष्ट होऊ लागतात. हे सर्व मांडताना गणेशपूजा, प्रचंड उधळपट्टी, दमदाटी, मुलींची टिंगल, मारामाऱ्या, बाटली व धुव्वा इ. गोष्टी आवश्यक किंवा अपरिहार्यच असतात असे नाही; पण 'साईड इफेक्ट' म्हणून त्या घडतात. त्याच गोष्टी 'फोकस' करणे अडाणीपणाचे ठरेल. वैयक्तिकदृष्ट्या यापैकी कोणतीच गोष्ट मला मंजूर नाही हेही स्पष्ट आहे; पण एक मात्र नक्की की एकदा या बाजूने विचार केल्यावर असे वाटू लागते की अशी प्रदर्शने, टीका किंवा पत्रव्यवहार या गोष्टी खूपच निरर्थक व गैरलागू वाटू लागतात. सर्वसामान्याची ही गरज आहे हे ओळखून जर पर्यायी विचार आला नाही तर हे गणेशोत्सव असेच घडत राहाणार ! प्रश्न गणेशोत्सवाच्या हिडिस स्वरूपाचा किंवा गणेशपूजेचा नाही तर 'मानवी गरजा' हरवून बसलेल्या सर्वसामान्यांना त्या मिळवून द्यावयाच्या, मार्गी लावण्याचा आहे. ❑

# इराक-इराण युद्ध

## नव्या सत्तासमतोलाची शक्यता

**वा. दा. रानडे**

'इराक आणि इराण दोन्ही इस्लामी राष्ट्रे. त्यांच्यातल्या युद्धात कोणीही जिंकले किंवा हरले तरी आम्हाला काय सोयरसुतक? आमच्यावर त्याचा काय परिणाम होणार आहे? मग त्याच्या युद्धाच्या बातम्या आमच्या वृत्तपत्रांनी रकानेच्या रकाने भरून का द्याव्यात?'

माझे एक हिंदुत्वनिष्ठ मित्र आपली प्रामाणिक प्रतिक्रिया व्यक्त करीत होते. त्यांचे म्हणणे काय चुकीचे आहे असाच प्रश्न प्रथमदर्शनी कोणाच्याही मनात येणे स्वाभाविक आहे. या बाबतीत एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की, युद्ध हा माणसाला नेहमीच आकर्षक वाटत असलेला विषय आहे. अरब-इस्राइल युद्धाशी तरी आपला काय संबंध होता? पण त्याच्या बातम्या आमच्या वृत्तपत्रांनी रकाने भरून दिल्या आणि वाचकांनीही त्या उत्सुकतेने वाचल्या. इराक-इराण युद्धाबद्दलही तसेच म्हणता येईल.

आणि युद्धाशी आपला प्रत्यक्ष संबंध नसला तरी युद्ध खेळणारी दोन्ही राष्ट्रे तेलसंपन्न असल्याने त्याचा परिणाम आपल्यावरही होणार आहे. आपला देश या वर्षी १ कोटी ६० लाख टन क्रूड तेलाची आयात करणार आहे. त्यापैकी १ कोटी १० लाख टन तेल या दोन देशांकडून आयात करण्याचे करार आपण केलेले आहेत. बॉंबफेकीने दोन्ही देशांतील तेलसाठे उद्ध्वस्त झाले असून इराणच्या तेलआखातातून होणारी तेलवाहतूक बंद पडली तर मोठीच बिकट परिस्थिती निर्माण होण्याचा संभव केवळ भारतापुढेच नव्हे तर जगातील इतर राष्ट्रांपुढेही असल्याने युद्ध लवकर थांबविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत व हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत कदाचित ते थांबलेलेही असेल!

हे युद्ध का उद्भवले? इराकने इराणवर आक्रमण का केले? आणि आक्रमण करणाऱ्या राष्ट्राचा निषेध व आक्रमणाला बळी पडलेल्या देशाबद्दल सहानुभूती अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया आढळायला हवी; या युद्धाबद्दल ती का दिसून आली नाही? सीमावादातून हे युद्ध उद्भवलेले आहे. या दोन देशांच्या सीमेवर असलेल्या शात अल-अरब नदीवर, विशेषतः इराणच्या आखाताला मिळणाऱ्या तिच्या मुखावर ताबा कोणाचा याबाबत या दोन देशांत फार पूर्वीपासून वाद आहे. अमेरिकेकडून इराणच्या शहांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रखरेदी केली होती आणि या लष्करी बळाच्या जोरावर पाच वर्षांपूर्वी शहांनी इराकला सीमेबाबतचा आपल्याला अनुकूल करार मान्य करायला भाग पाडले होते. या करारानुसार शात-अल-अरब नदीच्या मुखाच्या अर्ध्या भागावर आणि त्यातील तीन छोट्या बेटांवर इराणने ताबा मिळविला. इराकला हा ताबा मान्य नव्हता; पण त्या वेळी तो अडचणीत होता. देशात कुर्दिश टोळ्यांच्या बंडाचा जोर वाढला होता. बंडखोरांना इराणच्या शहांकडून मदत मिळत होती. ही मदत थांबविणे आवश्यक होते. इराकने शहांकडून ते आश्वासन मिळविले आणि त्याची किंमत म्हणून हा नामुष्कीचा करार मान्य केला.

आता पाच वर्षांनी अनुकूल संधी नेमकी साधून शात-अल-अरब नदी आणि तिच्या मुखाशी असलेली तीन छोटी बेटे यावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी इराकने लढाई सुरू केली. इराणमध्ये शहा पदच्युत होऊन आयातुल्ला खोमेनी यांची धर्मनिष्ठ राजवट आणली. इराणी लष्कराच्या अनेक अधिकाऱ्यांची या राजवटीने कत्तल केली. त्यामुळे लष्कर दुबळे व नेतृत्वहीन झाले. खोमेनींच्या राजवटीशी अमेरिकेचे संबंध बिघडले होतेच. ओलिसांच्या प्रश्नावरून ते अधिकच बिघडले. खोमेनींनी धर्मनिष्ठ राजवट इराणवर लादली हे इतर अरब राष्ट्रांना पसंत नव्हते. त्यामुळे इराण एकाकी पडला. अमेरिकेच्या मदतीने व प्रोत्साहनाने इराकचे अध्यक्ष सद्दम हुसेन आपली राजवट उलथविण्याचे प्रयत्न करीत आहेत असा खोमेनींना संशय होता. तेव्हा डाव उलटविण्यासाठी हुसेन यांचीच राजवट उलथून टाका अशी खोमेनींनी शियांना चिथावणी दिली. खोमेनी शिया आहेत तर हुसेन सुन्नी आहेत. इराकमध्येही अल्पसंख्य शिया आहेत. दोन देशांतील या संघर्षाला याप्रमाणे शिया विरुद्ध सुन्नी असेही स्वरूप आले.

या संघर्षात साऱ्या अरब राष्ट्रांचा पाठिंबा इराकला असल्याचे दिसून आले. सौदीअरेबियाने तर लष्करी मदतही इराकला देण्याची तयारी दर्शविली. अरब मुस्लीम विरुद्ध बिगर-अरब मुस्लीम असे स्वरूप या संघर्षाला आले. या युद्धात सुरुवातीपासूनच इराकची सरशी दिसून आली. नासरनंतर अरब राष्ट्रांना प्रभावी नेता नव्हता सद्दम हुसेन यांच्या रूपाने असा नेता पुढे येत आहे. शातअल-अरब नदी आणि तिच्या मुखाजवळची तीन बेटे यावर इराकने आपले प्रभुत्व प्रस्थापित केले तर इस्राइलविरुद्ध संघर्षातही अरबांची बाजू बळकट होण्यास मदत होईल.

अमेरिका व रशिया या बड्या राष्ट्रांनी या संघर्षात पडावयाचे नाही असे ठरविल्याने त्यातून आता विश्वसंहारक महायुद्धाचा धोका राहिलेला नाही. युद्ध लवकर न संपता लांबले तरीही त्याचे क्षेत्र मर्यादित राहील; पण बडी राष्ट्रे या संघर्षात प्रत्यक्ष पडली नाहीत तरी त्यांचे हितसंबंध या प्रदेशात गुंत-

पृष्ठ २२ वर

आदिवासी .... रंजाण्यातले

# अशा लोकांसाठी आपण कशाला काही करावं ?

भीमराव खामगावकर, शिंदखेडा, जि. धुळे

रंजाणे. शिंदखेडा तालुक्यातील गाव. दोन वर्षांपासून शहाद्याच्या ग्रामस्वराज्य समितीनं गरिबाचं पक्कं संघटन ह्या गावात बांधलं. कोणत्याही कार्यक्रमात रंजाण्याची गरीब माणसं पुढं. मोर्चा असो, सभा असो. त्याची मागणी, राउळांची शंभर एकर जमीन सीलिंगमध्ये वाटली गेली. ज्यांना जमिनी होत्या त्यांनाच जमिनी परत मिळाल्या, जे. एस. आर. पी. त होते त्यांना मिलिटरीच्या नावाखाली जमिनी मिळाल्या. हा त्यांचा आक्षेप. त्या जमिनीची चौकशी होऊन फेरवाटप व्हावे ही रंजाण्याच्या आदिवासींची मागणी. तालुक्यातील काम वाढल्याने रंजाण्याकडे थोडेसे दुर्लक्ष झाले. त्यामुळे रंजाण्यास बरेच दिवस जाता आले नव्हते. गरीब आदिवासी नेहमी तक्रार करीत तुम्ही आमच्या गावास येत नाही. तुम्ही आमचे काम करीत नाही. तुम्हाला आज रंजाण्यास नेल्याशिवाय राहणार नाही! अगदी लहान मुलासारखा हट्ट धरून बसत. हे सारं प्रेमापोटी. त्याची समजूत काढावी. पुढच्या वेळेस नक्की येऊ असं सांगून त्यांना निरोप द्यायचा, असं चालू होतं.

शेवटी एक दिवस त्यांच्या गावाकडे सायकलने निघालो. संध्याकाळचा साधारणतः ५ वाजण्याचा सुमार. गेल्याबरोबर काहींच्या भेटी झाल्या. गप्पा झाल्या. अर्धा-पाऊण तास गेला. म्हटलं रात्रीला मीटिंग घेऊ. सर्व जण आपआपल्या घरी गेले.

स्थानिक तरुण कार्यकर्ता, चैत्राम जाधव, सहा-सव्वासहा वाजले होते. गावाभोवती मोकळी जमीन. जरा फिरून यावसं वाटलं जंगलातून म्हटलं 'चल चैत्राम आपण जरा फिरू येऊ.' तोही म्हणला 'चला!' शंभर पावलं पुढं गेलो नाही तोच एक गर्जना कानावर आदळली–'कथा सतो भीमराव; कशाला उणा आये? त्यानं काय कामसं? आमाले संघटना नही जोईजे. तुनी मायनी...' आणि पुढं बीभत्स शिव्यांची लाखोली! अंगात फक्त अंडरवेअर, बनियन आणि हातात डोक्याहून उंच लोखंडी तीक्ष्ण भाला. जोरजोरात ओरडत, शिव्या देत, मैदानात उडयाच मारताना दिसला. भाल्याचे टोक दात खाऊन जमिनीत आपटून रुतविण्याची कृती.

त्याचं बडबडणं ऐकून जागीच थांबलो चैत्रामला म्हटलं, 'काय भानगड आहे? तो मलाच का शिव्या देतो? तो तर तुझाच भाऊ आहे लहान. सुका!' चैत्रामलाही आश्चर्य वाटलं. असं कधीच झालं नव्हतं. चैत्रामला म्हटलं, 'चल. त्याच्याकडं जाऊ' म्हणून शांतपणे त्याच्याकडंच निघालो. सोबत चैत्राम. त्याची बडबड ऐकून प्रत्येक घरातली बाया-माणसंही घराबाहेर पटापट पडली. गावातली येणारी-जाणारी मंडळीही थबकली.

जाऊन त्याच्या समोर शांतपणे उभा राहिलो. म्हटलं, 'तू मला मारतोस का? मार मला, तुझ्या हातात तर भला मोठा भाला आहे. माझ्या हातात तर काहीच नाही. एकही माणूस तुला आडवा यायचा नाही. मार!' एका मिनिटासाठी त्याची बडबड माझ्या बोलण्याने थांबली. तोंडाचा, दारूचा वास येत होता. डोळे लालभडक दिसत होते. अधूनमधून झोकही जात होते. मी त्यास मारण्याचे आव्हान केल्याने, का कोण जाणे तो अंगावर मात्र धावला नाही. शिव्या देणं बंद झालं. परंतु काही स्त्री-पुरुष मला शिव्या दिल्याने खवळले होते. त्याच्यावर संतापले होते; पण मी कुणासही त्याला बोलू दिलं नाही. मी समोरच जाऊन उभा राहिल्याने शिव्यांचा मोर्चा भावाकडे वळविला. चैत्रामला, त्याची बायको गीताला, इतर संघटनेच्या स्त्री-पुरुषानाही. त्यामुळे बरेच लोक चिडले. आतापर्यंत गप्प राहिलेला चैत्रामही खवळला. त्याने जवळच्या छपराचा बांबू हातात घेऊन मारायला धावला. सुकाही तयारीतच होता. त्याकडे तर लोखंडी भालाच! मी दोघांच्यामध्ये पडलो. एक-दोन स्त्रिया पडल्या, इतर माणसं तटस्थ. चैत्रामला काय आठवलं? हातातला बांबू फेकून धावत तो घरात गेला. घरातून भल्ली मोठ्ठी चमकती फरशी कुऱ्हाड घेऊन पळतच तो त्याच्या अंगावर धावला. आडमाप ताकदीचा चैत्राम मला आवरणार नव्हता. तरीही धावतच त्याला आडवा झालो. यमुनाबाई, गीताबाईंनीही त्याला अडविलं, तो कुऱ्हाड घेऊन बाहेर पडायच्या अगोदर चैत्रामची बायको काठी घेऊन मैदानात उतरलेली होती; पण चैत्रामचे आडमाप क्रौर्य व त्वेष पाहून तीही नवऱ्याला आडवी झाली. मी एक वेळ चैत्रामला तर एक वेळ सुकाला आवरत होतो ह्या दोघांचा मोठा भाऊ विक्रम मात्र एकाच बाजूला गमत पाहात उभा होता. मला ह्या भानगडीचं आश्चर्य वाटत होतं. मध्यस्थी कुणीच करीत नव्हतं. तरणीताठी पोरं आजुबाजूला उभं राहून तमाशा पाहात होती. माझा मात्र थरकाप उडत होता. कदाचित ते दोघं एकमेकांवर तुटून पडले तर निश्चितच कुणाचा तरी मुडदा खासच पडणार, हे मी जाणून होतो. त्यामुळे मी आटोकाट प्रयत्न करून दोघांना भिडू मात्र दिले नाही. कारण कार्यकर्ता प्रत्यक्ष हजर असल्यास काही अनुचित प्रकार घडणं हे मला योग्य वाटत नव्हते व जर काही अघटित घडले तर त्याला बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मी जबाबदार निश्चितच राहिलो असतो. त्यामुळे शेवटी सुकाला बाजूला करून परत चैत्रामकडे धावलो. त्याचे शरीर क्षणाक्षणाला फुगत होते. चैत्रामच्या हातातील कुऱ्हाड गीताबाईने हिसकावून घेतली. त्याला चार-पाच जणांनी घराकडे ओढून नेले मी त्याला बजावून दिले की, तू आता एक [illegible]

बोलू नकोस. माझा शब्द त्याने ऐकला. परत सुकाकडे धावलो. त्यास त्याच्या झोपडयाकडे बळजबरी पाठविण्याचा प्रयत्न केला. तो परत माझ्यावर गुर्कावला. 'माले आठेस तुबा राहूणेस' शेवटी त्याचंही बोलणं हुळहळू बंद झालं.

एव्हाना अंधार पडायला लागला होता. मी चैत्रामच्या दारात खाट टाकून बसलो. सर्वजण आपपल्या घरात बसून होते. कुणीच काही बोलत नव्हते. मला त्या गावी जाऊन पश्चात्तापही होत होता व समाधानही. कदाचित माझ्यामुळे भीषण घटना टळू शकली असे वाटायला लागले. हे एका दृष्टीने बरे झाले; पण ज्यांच्यासाठी रात्रंदिवस तत्पर असतो, त्यांनीच आपल्यावर वरतंगडी करावी का? मी त्यांचं काय बिघडवलं होतं? माझ्या येण्यानं त्याला काय त्रास झाला होता? अशा लोकांसाठी आपण कशाला काही करावं? इतकं करूनही ह्यांना थोडीही जाणीव असू नये का? असे एक नाही अनेक प्रश्न मनात निर्माण झाले.

त्याच्या जागी एखाद्या विरोधकाने मला मारले किंवा शिव्या दिल्या असत्या तर त्याविषयी विशेष काही वाटले नसते. ते तर कोणत्याही गावात होऊ शकते हे गृहीतच धरलेले आहे आणि सहाजिकच आहे; परंतु ज्या गरिबांची संघटना आपण बांधतो, त्यांच्यासाठी सरकारी अधिकारी व जमीनदाराशी भांडतो, त्यांनीच असे करावे काय? हे कितपत योग्य आहे? शेवटी मनाची समजूत करून घेतली. त्याला एवढी समज असती तर त्याने मला शिव्या दिल्या असत्या का? मला मारायला धावला तो असता का? याचं उत्तर निश्चित 'नाही!'

रात्रीला दहा–साडेदहाला भिलाटीच्या एका कोपऱ्यात २०।२५ लोकांची मीटिंग भरली. बराच वेळ अगोदर त्यांची मीटिंग चालली. शेवटी मला बोलावणं आलं. यमुनाबाई, गीताबाई वगैरे म्हणू लागले, 'तुम्ही तिकडं जाऊ नका. कदाचित धोका होईल! मी त्यांना समजावून सांगितले, 'धोका जरी झाला तरी काही हरकत नाही. मला गेलं पाहिजे!' चैत्राम रागातच बोलला. 'धोका कसा होईन! तुमच्या अंगाला हात तर लावू द्या कोणाला मग पाहतो एकाएकाची इत्यादी. शेवटी मी त्यांच्यात गेलो सुकाही होता. त्याची नशा उतरली होती. डोळ्यावरची धुंदी उडाली होती. बसलेल्यापैकी सर्वांनाच पश्चात्ताप होत होता. मला शिव्या दिल्याबद्दल सर्वजण सुकास दोष देऊ लागले. आपणात काही का होईना, कार्यकर्त्यास कशाला शिव्या दिल्या? ते तर आपल्यासाठीच कष्ट घेतात. तू त्यांच्यावर का धावला?

सुका ह्या वेळी मात्र थंडपणे ऐकत होता. ह्या वेळी प्रत्येकाचा खरपूस समाचार घेतला. खूप बोलायचं होतं ते बोलून घेतलं. सर्वच शांत होते. काही अंतर्गत वादावरून एवढे प्रकरण पुढे गेले होते. पुढे काही दिवसानी सुका भेटला. स्वत हून 'नमस्कार भाऊसाहेब' म्हणाला. मला समाधान वाटले.

□

# अडाणी आदिवासींचा मुका 'आक्रोश'

मुंबईच्या 'मेट्रो' व 'सत्यम्' या चित्रगृहात 'आक्रोश' हा हिंदी चित्रपट मॅटिनीशोमध्ये गाजत आहे.

निर्माते श्रीदेवी दत्त व श्री नारायण केणी यांच्या या चित्रपटाची कथा व पटकथा विजय तेंडुलकर यांनी लिहिलेली आहे आणि संवाद सत्यदेव दुबे यांचे आहेत. गोविंद निहलाजी हे छायाचित्रकार आणि दिग्दर्शकही आहेत.

लहान्या नावाचा एक आदिवासी (ओम् पुरी). पत्नीचा खून केल्याच्या आरोपावरून तुरुंगात जातो. त्याने खून क केला हे समजावून घेण्यासाठी सरकारी वकील भास्कर कुलकर्णी (नासीरुद्दिन शहा) खूप प्रयत्न करतो, पण लहान्या बोलतच नाही. भास्करची ही पहिलीच केस. यामुळे त्याला केसबद्दल विशेष तळमळ आहे. तो लहान्याच्या वडिलांना, गावकऱ्यांना, संपादकाला भेटतो; पण काहीच माहिती कळू शकत नाही. भास्करवर हल्ला होतो; पण भास्कर पीछा सोडीत नाही. आदिवासींमध्ये काम करणारा कम्युनिस्ट कार्यकर्ता त्याला एवढेच सांगतो – सभापती, फॉरेस्ट ऑफिसर वगैरे गावातल्या चार धेंडांनी लहान्याच्या पत्नीवर बलात्कार केला आणि तिचा खून करून तो आरोप लहान्यावर ठेवला; पण या धेंडांना गुन्हा शाबित करणारा पुरावा नसतो. यामुळे भास्कर काही करू शकत नाही. त्याचे भले इच्छिणारा त्याचा सिनिअर वकील साने (अमरीश पुरी) भास्करला केसमध्ये असे गुरफटून न जाण्याबद्दल वारंवार बजावतो. 'वकिली करायची आहे की क्रांती' असा त्याचा नेहमी भास्करला सवाल! भास्कर म्हणतो, हा सवाल करीत असताना मी जर अपघाती मेलो तर तो केवळ अपघात म्हणाल का? साने म्हणतो पुरावा नसेल तर माझ्या दृष्टीने तो अपघातच ठरेल. भास्कर काही निर्णयाने चालू लागतो. येथे चित्रपट संपतो.

'तो' आणि 'ती' यांचे सफल किंवा विफल प्रेम, कधी तो आणि ती यांचा विवाह, बेबनाव, पुनर्मीलन याभोवतीच हिंदी चित्रपटसृष्टी गेली कित्येक वर्षे घोटाळते आहे. चांगले म्हणावेत, असे 'अभिमान' 'अनुभव' 'रजनीगंधा', 'छोटीसी बात' 'एक बार फिर' हे चित्रपटही या साचाला अपवाद नव्हते. ते पाहून परदेशी माणसाला वाटावे भारतात लोकांना प्रेमाखेरीज उद्योग नाही आणि समस्याही नाहीत! 'मंथन' किंवा आक्रोश' सारख्या कथा लिहून विजय तेंडुलकरानी 'तो' 'ती' यांच्या साच्यातून हिंदी चित्रपटसृष्टीला बाहेर काढले ('सामना' द्वारा मराठीही) आणि पुष्कळ प्रमाणात वास्तवतेशी आणून भिडविले. वरवर पाहता 'सामना' 'मंथन' हे चित्रपट किंवा 'पाहिजे जातीचे' याप्रमाणेच 'आक्रोश' मध्ये ग्रामीण राजकारणाचे चित्र आहे; पण ग्रामीण राजकारण हा चित्रपटाचा विषय नाही. पुराव्याअभावी न्यायालयाची न्याय देण्याची असमर्थता हा

'आक्रोश' या चित्रपटाचा विषय आहे.

नव्या विषयाची ही मोठी जमेची बाजू वगळता बाकी चित्रपट खास सामाधान देत नाही किंवा खास वैतागही देत नाही. विषयाची हाताळणी तशी ढोबळच वाटते. त्यात सूक्ष्मता नाही. अनेक गोष्टी खटकतात. समाजकार्यकर्त्याला अज्ञात इसम घेऊन जातात ही बातमी भास्करला कळत नाही. 'तुमच्या मित्राची बातमी कळली का ?' असे त्याला हेतुपुर.सर विचारले जाते. भास्करला काही माहिती नसूनही तो यावर काहीच विचारीत नाही आणि सांगणाराही सांगत नाही, याचे आश्चर्य वाटते. बरेचसे अज्ञात फोन, दारावर ठोकणे कोणाचे हे शेवटपर्यंत कळत नाही. गावातल्या धेंडांच्या या कारवाया हे आपल्याला जनरल नॉलेजमुळे कळते, पण चित्रपटातून कळत नाही. सरकार बाजूचाच सिनीअर वकील दुसाने मधेमधे कोर्ट चालू असताना भास्करच्या विरुद्ध बोलतो ही गोष्ट तो गावातल्या प्रस्थांना सांभाळून आहे हे लक्षात घेताही विचित्रच वाटते. गाव समुद्राच्या किनाऱ्यावरचा आहे. तेथे भरपूर झाडी वगैरेही आहे. तेथे पाटील, कुळकर्णी अशी मराठी नावेही आहेत. लोकाचे पोषाख मराठीच वाटतात. यामुळे हे कोकणातील जिल्ह्याचे ठिकाण आहे असे वाटते; पण घरे देशावरची वाटतात. लोकाचे पोषाख, दणकट शरीरयष्टी, एकंदर व्यक्तिमत्वे ही देशावरच्या लोकाप्रमाणे वाटतात. 'तमाशाचा फड' हेही मुख्यत: देशावरच्या खेड्याची करमणूक आहे, कोकणातली नाही. ग्रामीण राजकारणाचे चित्र जेव्हा पार्श्वभूमीला असते तेव्हा प्रादेशिक वातावरणाला महत्त्व असते. ते नीट उभे राहिले नाही तर कथानक विषय, एकंदर चित्रपटाचा तोल थोडा ढळतोच. तसा तो येथे ढळला आहे. 'मंथन' किंवा 'सामना' या चित्रपटांना एक निश्चित प्रादेशिक पार्श्वभूमी असल्यामुळे नेमकेपणा वाटत होता तसा तो यात वाटत नाही. या चित्रपटातील एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करायला हवा. लहान्याच्या पत्नीवर (स्मिता पाटील) चौघे बलात्कार करतात. हे दृश्य केवळ तिचा आक्रोश आणि इतर आवाज यांनी सूचित केले आहे. स्त्रीदेहाचे जेवढे प्रदर्शन करता येईल तेवढे करायचे हा आजच्या चित्रपटांचा धर्म आहे. बलात्कारदृश्यात तर जे कलादृष्ट्याच आवश्यक असे म्हणून सहजपणे समर्थनीय ठरविता येते. अशा या जमान्यात केवळ सूचकतेने बलात्कारघटनेचा अपेक्षित गंभीर परिणाम साधणे हे विशेष प्रशंसनीय म्हणावे लागेल. ही सूचकता लक्षात घेता चित्रपटांतील दोन दृश्ये फारच खटकतात. त्यातील एक म्हणजे स्मिता पाटील आणि ओमपुरी यांचे शयनदृश्य. या शयनदृश्याने लहान्या आणि त्याची पत्नी याचे संबंध, काही स्वभाववैशिष्ट्य यावर विशेष प्रकाश पडत नाही किंवा या दृश्याने कथानकाचे महत्त्वाचे सूत्र हालत नाही. दुसरे दृश्य तमाशाचे. या तमाशाच्या फडातूनही कथानक, विषय यांच्या दृष्टीने महत्त्वाचे काही घडत नाही; पण गाव म्हटला की, तमाशा हवा आणि चित्रपट म्हटला की, बाईचा नाच हवाच ! असेच या तमाशाकडे पाहून वाटते. रिमा लागू नाच करू शकतात एवढेच फक्त यातून कळते; पण रिमा लागूचा चेहरा धंदेवाईक तमासगिरिणीला साजेसा नाही. यात त्यांच्या अभिनयगुणालाही वाव नाही. दोन्ही दृश्ये चित्रपटाचे कथानक, विषय यांच्या दृष्टीने अनावश्यक म्हणूनच सवंग आहेत.

गोविंद निहलानी याच्या कॅमेऱ्याने उभी केलेली वातावरणनिर्मिती, कलाकाराचे उत्कृष्ट अभिनय, विजय तेंडुलकरांचे ठीक कथानक यामुळे अडीच तास प्रेक्षक चित्रपटात पूर्णपणे गुतून जातात. बिलकूल कंटाळा येत नाही. सत्यदेव दुबे याचे संवाद मात्र सपक वाटतात. 'सिंहासन'मधले विजय तेंडुलकरांचे संवाद जसे खणखणीत, वजनदार आणि पात्राचे व्यक्तिमत्त्व सांगणारे होते जसे सत्यदेव दुबे यांचे संवाद नाहीत. अमरीशपुरी, ओमशिवपुरी, नासिरुद्दिन शहा या प्रमुख कलाकाराचे अभिनय उत्तम आहेतच; पण नाना पळशीकर, अरविंद देशपांडे, विहंग नायक दुय्यम भूमिका करणारे असूनही त्यांच्या अभिनयामुळे मनात ठसून जातात. स्मिता पाटील एकंदर चित्रपटात अवघी पाचसात मिनिटेच पडद्यावर आहेत. त्यातली निम्मी मिनिटे शयनदृश्यात गेली आहेत. उरलेल्या वेळात त्या जो एकच संवाद फेकतात त्यात त्या आदिवासी स्त्री वाटू शकत नाहीत. शब्द उच्चारण्याची पद्धत, चेहऱ्यावरचे हावभाव सगळे 'शहरी' वाटते. कारकुनावर त्याची बायको तणतणावी तशाच आदिवासी 'स्त्री'च्या भूमिकेतील स्मिता पाटील तणतणतात. यापेक्षा एकही शब्द न बोलता वावरणाऱ्या धनश्री कोटणीस (लहान्याची बहीण) आदिवासी स्त्री फार सहजपणे उभी करतात. अशिक्षित स्त्रीचा भाबडा भाव, मुग्ध यौवन त्यांच्या डोळ्यात प्रतिबिंबित होते.

मराठी रंगमंचावरचे अनेक कलाकार या चित्रपटात आहेत. त्यांनी आपापल्या भूमिका चोख केल्या आहेत. वंदना खांडेकर, माधुरी पुरंदरे या पार्श्वगायिका अमराठी प्रेक्षकांना नवीन आहेत. अजित वर्मन यांचे संगीत आणि या दोघीचे पार्श्वगायन प्रसंगानुकूल आहे.

चित्रपटाला 'आक्रोश' हे नाव सार्थ आहे. हा अडाणी आदिवासीचा मुका आक्रोश आहे. असहाय स्त्रीचा टाहो फोडणारा आक्रोश आहे. न्याय मिळवून देऊ इच्छिणाऱ्या सुशिक्षित, संवेदनाक्षम तरुणाचा बोलका आक्रोश आहे

हा चित्रपट केवळ प्रौढासाठी का असावा ते कळत नाही हा जर प्रौढासाठी तर मग अनेक इतर चित्रपट सगळ्यासाठी का ठेवावेत असा प्रश्न पडतो.

— विनया खडपेकर


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

८ ऑक्टोबर ही जयप्रकाशांची प्रथम पुण्यतिथी. त्यानिमित्त....

# जयप्रकाशजींची शैक्षणिक संकल्पना : एक पुनरावलोकन

डॉ. म. पु. कॅवुरकर

गेल्या तीन वर्षातील आपल्या राजकीय नेतृत्वाच्या व एकूणच समाजाच्या आत्मघातकी करंटेपणाने 'संपूर्ण क्रांती' ही शब्दसंहती जनमानसातून पुसली गेली की काय अशी शंका येत राहिली तरी वस्तुत: त्या संकल्पनेचे आजच्या जीवनसंदर्भालाही अर्थपूर्णता देण्याचे सामर्थ्य कमी झाले आहे असे वाटत नाही. जीवनाच्या सर्व क्षेत्रांचे भयानक अतिरिक्ततेने राजकीयीकरण झाल्याने राजकारणाच्या पलीकडे नेणाऱ्या व राजकारणालाही पोटात घेणाऱ्या 'संपूर्ण क्रांती'च्या संकल्पनेच्या *जयप्रकाशजीच्या आकांतातील उत्कटता मनाला* आज अधिकच भिडते. त्यामुळेच जयप्रकाशजींच्या प्रथम पुण्यतिथीच्या निमित्ताने, त्यांनी सांगितलेल्या सप्त क्रांतीतील शैक्षणिक विचारांची उजळणी करावी या हेतूने हे विचार मांडीत आहे.

अर्थातच 'संपूर्ण क्रांती' तील मूलभूत सूत्रांचाच आविष्कार जयप्रकाशानी सांगितलेल्या कोणत्याही एका पैलूमध्ये दिसून येतो. या मूलभूत सूत्रांमध्ये शासनाची मर्यादा फारच स्पष्टपणे लक्षात घेतलेली आहे. 'मदांध होणे हा सत्तेचा स्वभाव आहे व अमर्याद सत्ता ही अनिर्बंधपणे भ्रष्ट होते' हे सूत्र जगाच्या इतिहासाने पुन्हा पुन्हा सिद्ध केले आहे. प्रस्थापितामध्ये शासनाचे हितसंबंध निर्माण होतात माओच्या सांस्कृतिक क्रांतिकल्पनेच्या मुळाशी असलेली, कोणतीही सत्ता स्थिर होऊ न देण्याची कल्पना याच वस्तुस्थितीच्या जाणिवेतून आलेली होती. शिक्षणक्षेत्राचा या दृष्टीने विचार करता जयप्रकाशांनी शिक्षणसंस्थांच्या स्वायत्ततेचा आग्रह धरलेला आहे. शासकीय अनुदानाने त्यांत बंधने येता कामा नयेत. अनेकदा शासनाच्या माध्यमातून राजकीय दबाव येतात. विशिष्ट पक्षाच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या प्रभावातून, संपूर्ण मानवी व्यक्तिमत्त्व शिक्षणाद्वारा जोपसण्याची प्रक्रिया थांबेल. मार्क्सच्या 'गोथा' कार्यक्रमावरील टीकेतही हेच सूत्र होते. शासनाने केवळ प्राथमिक शिक्षण द्यावे व सरकारने व चर्चने शिक्षणक्षेत्रापासून दूर राहावे हीच भूमिका त्यात व्यक्त झाली आहे. राजकीय प्रभावामुळे, स्वार्थसाधन व प्रतिष्ठाची प्राप्ती यासाठी शिक्षणसंस्था चालविण्याची प्रवृत्ती निर्माण होते. प्रस्थापितामध्ये हितसंबंध निर्माण होतात–राजकीय सत्तासंपादनाचे ह्या संस्था अड्डे बनून राहतात.

म्हणून जयप्रकाशांनी सांगितलेली अधिकाराच्या विभाजनाची व जबाबदारीच्या विकेंद्रीकरणाची कल्पना शिक्षणक्षेत्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरते. अतिरिक्त राजकीयीकरण, शासकीयीकरण टाळण्यासाठी संस्थांच्या व्यवस्थापनामध्ये शिक्षक, प्राध्यापक व पुढे विद्यार्थी याचाही साक्षात सहभाग आवश्यक ठरतो. या दृष्टीने छात्रसंघ व प्राध्यापक-शिक्षक संघटना अधिक सक्षम व हेतुपूर्ण बनणे आवश्यक आहे. दुर्दैवाने छात्रसंघ हे राजकीय सत्ताकांक्षेची परिपूर्ती करणाऱ्या शिडीचे पहिले पाऊल बनले व प्राध्यापक–शिक्षक संघटना या केवळ संघटित सामर्थ्याच्या जोरावर, वर्गीय हितसंबंधासाठी समाजाचे शोषण करण्याचे माध्यम बनल्या आहेत. एकूण शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी व सर्वंकष माध्यम आहे या दृष्टीने आपले योगदान देण्याचा विचार या क्षेत्रातील या घटकामध्ये दिसत नाही. जबाबदारीच्या विकेंद्रीकरणाने ही जाणीव निर्माण व्हावयाला निश्चितच मदत होईल. कोणत्याही मूलगामी, चिरंतन परिवर्तनाच्या कल्पनेत अभिप्रेत असलेली व्यक्ती व व्यवस्था दोन्हीतही एकदम बदल करण्याची कल्पना जयप्रकाशांच्या 'संपूर्ण क्रांती' त आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व परिपूर्णतेने विकसित होईल, तो परिवर्तनाचा अग्रदूत बनेल; पण त्याचबरोबर समाजाच्या सर्वांगीण परिवर्तनाचे माध्यम बनू शकेल अशी शैक्षणिक व्यवस्थाही निर्माण होईल असा दुहेरी बदल त्याना अभिप्रेत आहे. केवळ व्यवस्था बदलण्याच्या साम्यवादी विचाराला मानवी व्यक्तिमत्त्वाच्या स्खलनशीलतेची मर्यादा पडते व केवळ परिपूर्ण मानवाच्या, संस्कारवादी भारतीय संकल्पनेला सुयोग्य व अचूक व्यवस्थांची यंत्रणा लाभत नाही. म्हणून दोन्ही विचाराचा समन्वय साधण्याचा प्रयत्न जयप्रकाशाच्या विचारात आहे. मानवी व्यक्तीबरोबर सर्वांगीण व्यवस्थाही बदलल्या पाहिजेत व बदललेल्या व्यवस्थांच्या हेतुपूर्ण व परिणामकारक राबवणुकीसाठी व्यक्तिव्यक्तीही बदलली पाहिजे, सक्षम बनली पाहिजे असा हा सुवर्णमध्य त्यांना अभिप्रेत आहे.

म्हणूनच या दोन्ही गोष्टीसाठी जयप्रकाशांनी शिक्षण व कार्यानुभव याच्या संकरातून नवीन अभ्यासक्रमाची संकल्पना पुढे मांडली आहे. उद्योगप्रधानता व श्रमप्रतिष्ठा यांच्याबरोबरच अधिक नैतिक मानव साकार करणारा हा विचार आहे. कार्यानुभवातूनसुद्धा भारतीय जीवनसंदर्भाची फारकत होता कामा नये. पाश्चात्य कल्पनाचे कलम मूळ वृक्षच खाऊन टाकेल ही भीती आहे. शिवाय कार्यानुभव हा शिक्षणप्रक्रियेचा एकात्म भाग म्हणूनच येणे आवश्यक आहे. तो जोडलेल्या ठिगळासारखा असता कामा नये. या दृष्टीने 'नई तालीम' मधील शारीरिक व मानसिक कष्टांची कल्पना लक्षात घेण्यासारखी आहे. विनोबानीही हा विचार 'दिवसभर व्यवसाय व रात्री अध्यापन करणाऱ्या शिक्षकाची' कल्पना मांडून सांगितलेला आहे.' शिक्षणातून कमाई व कमाईतून शिक्षण' हे त्यांचे सूत्र आहे. 'एका तासाची शाळा, 'हंगामानुसार सुट्ट्यामध्ये बदल' या कल्पनाही

या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. मार्क्सच्या पूर्ण विकसित मानव निर्माण करणाऱ्या शिक्षणसंकल्पनेतही उत्पादनश्रम व शिक्षण ही कल्पना आहेच. चीनमध्ये तर मार्क्सच्या मुळातील 'अर्धे काम व अर्धे शिक्षण' या कल्पनेचा १९६६ पासून प्रयोग सुरू झाला त्यात शेतावर कारखान्यातून, खेड्यातून, कम्यून्समधून शिक्षण ही व्यवसाय क्षेत्रात शिक्षण देण्याची कल्पनाच होती. आपल्याकडे कोसबाडच्या श्रीमती अनुताई वाघांची 'धावत्या शिक्षणाची' कल्पनाही अशाच प्रकारची आहे.

## शिक्षणात आत्मनिर्भरता

अशा तऱ्हेची व्यवसायात्मक बुद्धी निर्माण करणाऱ्या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात परिवर्तन घडविणाऱ्या संस्कारांचा अंतर्भाव करण्याचीही कल्पना आहे. त्या दृष्टीने श्रमप्रतिष्ठा व श्रमनिष्ठा, सामाजिक जबाबदारी, मानवी संबंध व मूल्ये यांची जाणीव-युवाशक्तीचे समाजजीवनातील योगदान या सर्वांचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक ठरते. विद्यार्थ्यांच्या आंतरिक शक्तीचा सर्वांगीण विकास व जीवनविषयक ज्ञानाची आवश्यक ती साधना या दोन्हींची व्यवस्था या पद्धतीत अभिप्रेत आहे.

पण या दृष्टीने माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना म्हटळ आहे. ते परिपूर्ण असावे, त्याद्वारा कोणाही विद्यार्थ्याची सरळ साक्षात जीवनात प्रवेश करण्याची तयारी पूर्ण व्हावी ही कल्पना आहे. दुर्दैवाने १८८२ च्या हंटर कमिशनपासून सव शैक्षणिक कमिशन्सनी व शैक्षणिक क्षत्रातील अन्य विचारवंतांनी विद्यापीठीय व व्यावसायिक अशा दोन प्रवाहांमधून अलग विचार केला. १९६६ च्या कोठारी कमिशनने शिक्षणाच्या एकात्मप्रक्रियेचा प्रथमच विचार मांडला; परंतु नोकरशाही पातळीवरून होणाऱ्या राजकीय सोयीगैरसोयींच्या वळवळीत हाही विचार फसला. दिशाहीन व हेतुशून्य उच्चशिक्षणाची सूज कमी करण्याची आवश्यकता कोठारी कमिशनने हिरीरीने प्रतिपादिली. कारण शिक्षणातून केवळ Career Masters निर्माण व्हावेत, केवळ भौतिक गरजा भागविण्याचे शिक्षण मिळावे ही अपेक्षा नाही. केवळ तंत्रकौशल्य मिळविण्याची कल्पना डॉ. राधाकृष्णन यांनीही खोडून काढली होती. अशा तंत्रकौशल्यातून केवळ 'राक्षसराज' निर्माण होईल ही भीती त्यांनी व्यक्त केली. म्हणूनच Technical knowhow नव्हे तर Technical knowwhat ची कल्पना त्यांनी मांडली होती. या सर्व विचारांच्या पार्श्वभूमीवर जयप्रकाशांनी मांडलेली विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वविकसनाची व व्यवसायात्मक शिक्षणाची एकात्म कल्पना निश्चित मोलाची आहे.

जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीच्या कल्पनेत समाजधारणेची व परिवर्तनाची, आत्मनिर्भरतेची कल्पना आहे समाजाच्या अतिरिक्त राजकीयीकरणाने व शासकीयीकरणाने ही आत्मनिर्भरतेची, स्वयंप्रेरणेची ऊर्मी मारली जाते. खरी परिवर्तनकल्पना ही अशासकीय व अराजकीय पातळीवरूनच सिद्ध होऊ शकते. शिक्षणक्षेत्रातही आत्मोद्धाराच्या चळवळीला आतिशय महत्त्व आहे केवळ शासकीय पातळीपेक्षाही अन्य पातळीवरील प्रयत्नांची जोड शिक्षणप्रक्रियेला देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा कार्यानुभव एकूण देशातील विकासयोजनेशी (Developmental Planning) जोडून देणे आवश्यक आहे. संपूर्ण क्रांतीची कल्पना ही एकात्म कल्पना असल्याने समाजातील अर्थकारण, समाजकारण यांचा शिक्षणाशी अविभाज्य संबंध येथे अभिप्रेत आहे. सर्व क्षेत्रांतील परिवर्तन एकसमयावच्छेदे करून व्हावे हा विचार येथे प्रभावी आहे म्हणून '१६ वर्षांपर्यंत आत्मनिर्भरतेसाठी शिक्षण व १६ वर्षांनंतर आत्मनिर्भरतेतून शिक्षण' ही शैक्षणिक आत्मनिर्भरतेची कल्पना जयप्रकाशांनी मांडली आहे. अर्थात या विचारातून शिक्षणसंस्थाच ग्रामीण भागात केवळ हलविण्याची त्यांची कल्पना मात्र व्यवहार्य व उपयोगी ठरली नाही. गांधीजींच्या कल्पनेतही शेतीवर व आनुषंगिक व्यवसायांवर भर होता. लोकसंख्येचे ग्रामिणीकरण व उद्योगांचे खेड्यात विकेंद्रीकरण ही स्वयंपूर्ण खेड्याच्या कल्पनेतून गांधीजींनी मांडलेली कल्पना ही त्यांनी स्वतः मूलोद्योगाशी जोडली होती; पण त्यातूनही अर्थात सर्व प्रश्न सुटू शकत नव्हते हे डॉ. झाकीर हुसेन यांनी स्पष्ट केले होते. यातूनच पुढे जयप्रकाशांनी मांडलेली सुयोग्य तंत्राची (Appropriate Technology) कल्पना उदयाला आली. भांडवलशाही व साम्यवादी दोन्ही विचारांतील एकांकिता टाळून भारतीय परिस्थितीतून आवश्यक ठरणारी, येथला संदर्भ लक्षात घेणारी Technology आपल्या देशाला योग्य ठरेल हा वास्तववादी विचार त्यांनी मांडला. त्या दृष्टीने स्थानिक व राष्ट्रीय गरजांची दखल घेणे आवश्यक आहे. याचे एक व्यवहार्य रूप म्हणजे परंपरागत कौशल्य व आधुनिक विज्ञान यांचा संयोग होणे आवश्यक आहे. आज ग्रामीण व्यवसायांचा शोकांतिका पाहिली व काही परंपरागत वृत्तिवंतांचा झपाट्याने होत असलेला वृत्तिछेद पाहिला की या विचाराचे मोल जाणवते. खेड्यात महाविद्यालय आले म्हणून अशा वृत्तिवंताचा मुलगा शिकतो व या तथाकथित पांढरपेशा शिक्षणामुळे आपल्या घराला, समाजाला दुरावतो – बापाला बाप म्हणायला लाजतो, परंपरागत वृत्ती सोडतो व सुशिक्षित बेकारांमध्ये भर तरी टाकतो किंवा शहरात चाकरमानेपणा तरी स्वीकारतो – शिक्षणाच्या हेतुपूर्णतेशी या प्रश्नाचा संबंध निश्चितच आहे.

याच दृष्टीने नोकरी व पदवी यांची फारकत करण्याच्या आवश्यकतेवर जयप्रकाशांनी भर दिला आहे. अर्थात त्यांनी परीक्षाच रद्द करण्याची कल्पना मांडली; परंतु सध्याच्या परीक्षापद्धतीला अधिक व्यवहार्य पर्याय मात्र सांगितला नाही. या दृष्टीने पूर्वी एकदा श्री. सी. डी. देशमुख यांनी सांगितलेली कल्पना तथाकथित उच्चशिक्षणाचा मोह सुटण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी होती. काही नोकऱ्या केवळ मॅट्रिक झालेल्यासाठीच व २० वयोमर्यादेपर्यंतच ठेवाव्यात; या त्यांच्या सूचनेत पदवी रद्द करण्याची प्रक्रिया ही एकदम साध्य होणारी नाही याची जाणीव दिसते.

वास्तविक समाजाची खरी गरज व इच्छा लक्षात घेऊन (आपल्याला वाटते ती नव्हे.) त्याप्रमाण शिक्षण देण आवश्यक आहे. हा माओचा विचार या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. पावलो फ्रायर या लॅटिन अमेरिकन विचारवंताने तर शिक्षणाची क्रांतिकारी कल्पना मांडली आहे. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नातेच बदलून टाकण्याची आवश्यकता त्याने प्रतिपादिली आहे. सर्वांनीच सर्वांनाच जीवनाच्या माध्यमातून शिकविणे ही त्याची कल्पना आहे. Deschooling ची कल्पना मांडताना, जोवर माणसाचे व्यक्तिमत्त्व अपरिपक्व आहे व सत्य

परिवर्तनशील आहे तोवर शिक्षणाची प्रक्रिया अखंड उत्क्रांतच होत रहाणार असे त्याने म्हटले आहे शिक्षण हे शिकविणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर शिकणाऱ्याच्या गरजेप्रमाणे असणे आवश्यक आहे. खरे म्हणजे 'शिकविणे' नसावेच; केवळ ' शिकणे 'च असावे.

याच संदर्भात शिक्षणाच्या समानसंधीचाही विचार होणे आवश्यक आहे, डॉ. राधाकृष्णन् यांनीही याबाबतीत म्हटले आहे की, संधीची समानता म्हणजे संधीची एकरूपता नव्हे ( Equal opportunity not identical opportunity) या साऱ्या संदर्भात जयप्रकाशानी सांगितलेल्या पदवी व नोकरी यांच्या फारकतीच्या विचाराचा पुनर्विचार होणे आवश्यक वाटते. जीवन व शिक्षण यांच्या अविभाज्य संबंधाच्या या कल्पनेतूनच 'क्रांती हेच खरे शिक्षण' ही टॅन सुयीन यांची कल्पना जयप्रकाशांना मान्य असल्यासारखी दिसते. त्यानी चिनी सांस्कृतिक क्रांतीच्या संदर्भात रेड गार्डसच्या बाबतीत म्हटले होते – ' पोहोता पोहोताच पोहायचे कसे ते शिकता येते !' (To learn to swim while swimming) जयप्रकाशानीही ' महाविद्यालये एक वर्ष बंद ! ' असे आवाहन बिहार आंदोलनाचे वेळी दिले होतेच. विद्यार्थी हा क्रांतीचा अग्रदूत आहे ही अनेक देशांतील गेल्या दोन दशकांमध्ये नव्याने निर्माण झालेली जाणीव या विचाराच्या मुळाशी होती. क्रांतीची प्राथमिक उद्दिष्टे पूर्ण झाल्यावर विद्यार्थी नवीन अभ्यासानुसार आपले शिक्षण पूर्ण करतील असा त्यांचा विश्वास होता. अर्थात जगाच्या इतिहासातही हा विचार वादग्रस्तच ठरला आहे.

### अराजकीय परिवर्तन

कोणत्याही क्रांतिकल्पनेबद्दल विचार करताना उभा राहतो तोच प्रश्न अपरिहार्यतेने जयप्रकाशांचे शिक्षणक्षेत्रातील विचार पाहिल्यानंतरही मनात उभा राहतो. तो म्हणजे हे सर्व करणारे कोण ? कारण कोणत्याही क्षेत्रातील क्रातीचे माध्यम सामान्य माणूस आहे. क्रांतीच्या कोणत्याही संकल्पनेच्या आदिअंती सामान्य माणसातूने निर्माण होणारी जनशक्तीच असते. शैक्षणिक क्रातीचे माध्यमसुद्धा विद्यार्थी, शिक्षक, तज्ज्ञ, चालक शासकीय शिक्षणाधिकारी याच्या साऱ्यांमधील ' माणूस ' आहे. विचार कितीही चांगला असला तरी तो राबवणारा घटक किती आतरिक एकात्मतेने झडझडून निघतो ? आपल्या संकल्पनेशी त्याचे इमान किती ? स्वार्थाच्यावर तो किती जाऊ शकतो ? शैक्षणिक दृष्टी तो किती बाळगू शकतो ? यावर हे सारे यशस्वी होणे अवलंबून आहे व येथेच शिक्षणाबरोबरच लोकशिक्षणाचीही आवश्यकता जाणवते. कारण आपला समाज कसा आहे हे पाहिले तर या संपूर्ण क्रांतीच्या एकूण संकल्पनेबद्दलच शंका यावी असे वातावरण आहे. विशेषत: ७७ च्या राजकीय क्रांतीनंतर काही दिवस जयप्रकाशाच्या या संकल्पनेचे सोहाळे साजरे झाले. सभा, संमेलने, अभ्यासवर्ग, परिसंवाद या पातळीवरच हा विषय राहिला व पुढे आमच्या नेतृत्वाच्या व समाजाच्या करटेपणाने समाजातील क्रांतिकारी स्वयंप्रेरणा सतत तेवत ठेवण्याऐवजी समाज पुन्हा आत्मग्लानीच्या मरगळीत व्यस्त झालेला दिसतो आणि यामुळेच जयप्रकाशानी सांगितेलेला विचार अतिशय विदारकपणे जाणवत राहतो. तो हा की, खरी क्रांती जनशक्तीच घडवून आणू शकेल – केवळ राज्य नाही, तर समाज बदलावयाचा आहे. घदेवाईक राज्यकारण्याना समाजाने झिडकारून टाकले व अशासकीय, अराजकीय पातळीवरील परिवर्तनाची कास धरली व समाजाच्या शिक्षणाचा विचार केला तरच क्रातीला अग्रपूत लाभू शकेल. हे सामान्य माणसाचे युग आहे. तो जर जिवट श्रद्धेने उभा राहिला तरच देशाला तरणोपाय आहे. याची जाणीव आपण समाजात किती निर्माण करू शकतो यावर सारे अवलंबून आहे. नाही तर दर पुण्यतिथीला भावविवशतेने जयप्रकाशाना श्रद्धांजली वाहण्याचा सोहळा पार पाडायचा व अखेर त्यांना अवतार बनवून टाकायचे अशी अकर्मण्यतेची व उदासीनतेची झापड समाजाला येऊ पाहते आहे की काय अशी भीती वाटते. म्हणजेच शेवटी कोणत्याही जिवंत व जीवमान समाजाला आवश्यक असलेली देशभक्त, चारित्र्यसंपन्न, सामाजिक न्यायाची चाड असलेली, विज्ञाननिष्ठ पण आध्यात्मिक प्रेरणेने भरलेली जनशक्ती आपण कशी उभी करू हा प्रश्न आहे श्री. वसंत नारगोलकरानी आपल्या पुस्तकात आमच्या शिक्षणक्षेत्रातील दोष तपशिलाने मांडले आहेत. त्यांच्याही मुळाशी आमच्या ' माणसाचे व्यक्तिमत्व ' हाच खरा रोग आहे हे दिसून येते.

म्हणून पुन्हा एकदा प्राचीन भारतीय समाजरचनेतील अशासकीय, अराजकीय पातळीवरील समाजधारणेची संकल्पना जागविण्याची पराकाष्ठा करण्याची आवश्यकता आहे व या दृष्टीने कधी नव्हे त्या तीव्रतेने राजकीय नेतृत्वाचा वांझपणा समाजाच्या ध्यानात आलेला आहे. समाजाचा राजकारणाच्या सर्वंकषतेबद्दलच्या गेल्या तीस वर्षांत पोसलेला भ्रम नाहीसा होत आहे. अशा वेळी अशा सत्तेपासून दूर राहिलेल्या धर्मशक्तीनी (धारयतीति धर्म:) पुढे येऊन काही प्रबोधन केले, संघटन केले, जनशक्ती क्रांतिप्रवण केली तरच या समाजाला जयप्रकाशाच्या संपूर्ण क्रांतीची अनुभूती येऊ शकेल. अन्यथा काय हा प्रश्नच आहे ! □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे




लेखकाच्या मध्यपूर्वेतील
मनमुराद भटकंतीवर
व
इराणमधील वास्तव्यावर
आधारलेली वेगळी
लेखमाला

□

लेखांक नववा

# सर्फराझच्या घरी

आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये युनोची नोकरी ही इतर नोकऱ्यांच्या तुलनेत खूपच सुखाची म्हणावी अशी. भरपूर पगार, भरपूर सवलती, भरपूर मानसन्मान आणि घ्यावयाचा असल्यास भरपूर अनुभवदेखील! ह्या नोकरीची अडचण एकच–युनोचा नोकर म्हणून पाळावे लागणारे काही आंतरराष्ट्रीय नोकरशाही संकेत. ह्या संकेतांमुळे आणि पाळाव्या लागणाऱ्या शिष्टाचारांमुळे एकंदरीत दिनक्रम जरा मिळमिळीत म्हणावा असाच.

– आणि अगदी ह्या उलट आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील टेलिव्हिजन वार्ताहर आणि कॅमेरामनची नोकरी. ह्या नोकरीत सुखापेक्षा धोकाच नेहमी अधिक पगार अत्यंत अपुरा; पण इतर सवलती मुबलक. प्रत्यक्ष कामाच्या त्यात या देशातील 'सेन्सॉर'च्या मर्जीवर अवलंबून. मानसन्मान भरपूर पण एखाद्या वेळेस मानखंडना झाली तर तीदेखील भरपूर! अनुभव मात्र नेहमीच 'सेन्सेशनल'– रोमांचकारी! ह्या नोकरीचे देखील विशिष्ट संकेत आणि शिष्टाचार ठरलेले आहेत – ते सगळेच चांगले आहेत असं म्हणता येणार नाही.

युनोची नोकरी करताना दैनंदिन जीवनक्रम काहीसा चाकोरीबद्ध. सदैव घोटून गुळगुळीत केलेली दाढी, आफ्टर–शेव्ह–लोशनचा सुगंध, स्वच्छ इस्त्री केलेले कपडे, पॉलिश केलेले बूट आणि सभ्य–मृदुभाषेत, खालच्या आवाजात चाललेली चर्चासत्रे वगैरे.

आंतरराष्ट्रीय टीव्हीचा वार्ताहर कॅमेरामनची जिंदगी मात्र एकदम बेछूट आणि बेलगाम. अनिर्बंध आणि मुक्त. अनेक वेळा पंधरा पंधरा दिवस अंघोळ करायचा मोका देखील मिळणार नाही, मग गुळगुळीत दाढीची कुणाला फिकीर ! सुगंध (!) आलाच तर बियरचा आणि घामानं चिंब भिजलेल्या कपड्यांचा! चर्चासत्रे म्हणजे शिरा ताणून दिलेल्या घोषणा आणि युद्धआरोळ्या. 'जंग', दंगल, जाळपोळ, हाणामाऱ्या, राजकीय खून, लुटालूट अशा उग्रस्वरूपाप्रत पोहचलेली देशांतर्गत किंवा आंतरदेशीय 'भांडणे' ! मृदु आणि वरकरणी सभ्य भासणारी एकच गोष्ट म्हणजे राजकीय पुढाऱ्यांच्या मुलाखती. आंतरराष्ट्रीय टीव्हीचा वार्ताहर–कॅमेरामन म्हणून मी आयुष्य जास्त मोकळेपणे मनसोक्त जगलो का युनोचा अधिकारी म्हणून ? ह्या प्रश्नाचं चटकन उत्तर देणं कठीण —

– गतआयुष्यातील काही आठवणीत मी रमलो होतो आणि दिवेलागणीच्या सुमारास आमची गाडी शिराझ शहराची वेस ओलांडून आत शिरत होती. माझ्यातील 'झोपी गेलेला' वार्ताहर अस्वस्थपणे चुळबुळ करत होता, जागा होऊ पहात होता.

तेहरानमधील एका नवकवीला आणि तरुणपिढीच्या लाडक्या गायकाला 'सावाक'नं अटक केल्यामुळं शिराझ युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी बराच हिंसक गोंधळ घातल्याची खबर आम्हाला वाटेत

भेटलेल्या एका ट्रकड्रायव्हरकडून समजली होती मिलिटरी पोलिसांनी दंगल रोखण्यासाठी गोळीबार केला होता. त्यात काहीजण मरण पावले होते. अनेक विद्यार्थ्यांची धरपकड करण्यात आली होती. वातावरण जर चिघळलं तर शिराझममध्ये 'कर्फ्यू' लागण्याची देखील शक्यता होती. ट्रकड्रायव्हरकडून मिळालेल्या ह्या माहितीमुळे माझी उत्सुकता जागृत झाली होती आमची गाडी एका भल्यामोठ्या 'आण्लंड'ला वळसा घालत होती तेव्हा मी सर्फराझला म्हटलं –

'हॉटेलवर जाण्याअगोदर आपण जरा शिराझमधील मुख्य रस्त्यावरून एक चक्कर मारू या! जमल्यास मला युनिव्हर्सिटी देखील बघायची आहे आणि नंतर हॉटेल ......'

माझं बोलणं पुरं होण्याअगोदर सर्फराझ म्हणाला,

'आगा – ए विजे, शिराझमध्ये तू हॉटेलवर राहणार नाहीस, माझं इथं घर आहे, तुझी व्यवस्था मी घरी केली आहे.'

'अरे, घरी कशाला...मी कामासाठी आलोय, तुझ्या घरच्यांना उगाच तसदी कशाला देतोस? तू हवं तर रहा घरी. माझी अडचण नको. मी हॉटेलात राहीन!'

'ते चालणार नाही!' सर्फराझ आग्रहानं म्हणाला, 'माझं घर साधं आहे. जुन्या पद्धतीचं. आगा-ए-लुत्फी दारबंदीच्या घराप्रमाणे मॉडर्न नाही. तुझ्यासाठी मात्र अगदी स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली आहे. —पण खोलीला अॅटॅच्ड् बाथरूम किंवा संडास नाही. संडास इराणी पद्धतीचा आणि बाहेरच्या बाजूला आहे. तू राहून तरी बघ माझ्या घरी! तुला पसंत नाही पडलं, गैरसोयीचं वाटलं तर खुशाल जा हॉटेलमध्ये. माझी ना नाही; पण आजची रात्र तरी माझ्याकडे राहिलंच पाहिजे!'

सर्फराझचा घरी राहण्याविषयीचा आग्रह हा पर्शियन रीतिरिवाजाचा एक भाग आहे की मनापासून आहे ह्या संभ्रमात मी पडलो. काही तरी सबब सांगण्यासाठी मी तोंड उघडणार इतक्यात हैदरी म्हणाला,

'आगा-ए विजे, सर्फराझ बडा 'रईस' आहे. खैली फुलदार (पैसेवाला) आहे. त्याचं घर 'कदिमी' (जुन्या) महालासारखं सुंदर आहे. इराणमध्ये आता अशी जुनी घरं फार थोडी शिल्लक आहेत; तुला खूप आवडेल सर्फराझचं घर! तू त्याच्याकडेच रहा! ...... तेव्हढाच तुझा खर्च देखील कमी होईल. थोडे पैसे वाचतील आणि मग तुला एक पर्शियन गालीचा विकत घेता येईल!'

हे इराणी लेकाचे नेहमी पैशाचा हिशोब करणारे आणि हैदरीनं सर्फराझच्या घरी रहाण्याचा आग्रह करणे म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यातला प्रकार! मी त्याला जबाब देणार एव्हढ्यात सर्फराझनं सवाल केला –

'तुला खरोखरच आत्ताच शहरातून फेरफटका मारायचा आहे? आत्ताच युनिव्हर्सिटी बघायची आहे?'

'अलबत्त!' मी फार्सीमधून उत्तर दिलं.

'फार्सी बोलायला सुरुवात कर. लवकर शिकशील!' असं म्हणत सर्फराझनं हैदरीला सूचना दिल्या.

शिराझमधील मुख्य रस्ता खयाबान-ए–करीमखान–ए-झंद आम्ही उलटसुलट पालथा घातला. तेहरानमधील 'पहेलवी अव्हेन्यू'ची आठवण करून देणारा हा भव्य आणि रुंद रस्ता गजबजलेला होता. रस्त्याच्या दुतर्फा सर्व काही 'नॉर्मल' दिसत होतं. ट्रॅफिक पोलीस सोडले तर 'इतर' पोलिसांचा वावर कुठंच दिसत नव्हता. सब व्यवहार नेहमीप्रमाणे चालू होते. वातावरणात तणावाचा संपूर्ण अभाव–माझ्यातील जागृत झालेल्या वार्ताहराला जाणवण्याइतका माझ्या मनात मात्र प्रचंड तणाव-मला स्वत ला जाणवण्याइतका.

शिराझ शहरातील इतर पाच-सहा मुख्य रस्ते आम्ही पालथे घातले. तिथंही सर्व शांत शांत. सकाळी ह्या शहरात विद्यार्थ्यांनी हिंसक दंगल केल्यामुळे मिलिटरी पोलिसांनी गोळीबार केला, त्यात काही जण मरण पावले हे सर्व कपोलकल्पित वाटावं इतकं सर्व 'नॉर्मल' दिसत होतं. दंगलीची नामोनिशाणीही नव्हती!

### दंगलप्रतिबंधक पोलिसदल

तासभर शहराला 'गस्त' घालून आम्ही युनिव्हर्सिटी कॅम्पमध्ये गेलो कुठल्याही युनिव्हर्सिटी कॅम्पस्‌मध्ये संध्याकाळच्या वेळी नजरेस पडावं असच दृश्य इथं दिसत होतं. इराणच्या प्राचीन वास्तुशिल्पकलेची आठवण करून देणाऱ्या ह्या 'मॉडर्न' युनिव्हर्सिटीच्या आवारात जीन्स आणि टी-शर्ट घातलेले विद्यार्थी टोळक्या–टोळक्यांनी एकमेकांची थट्टामस्करी करत वावरत होते. अत्याधुनिक पोषाख केलेल्या इराणी विद्यार्थिनी हसतखिदळत एकमेकींच्या गळ्यात गळा घालून फिरत होत्या. तरुण-तरुणींचा एक घोळका व्हॉलिबॉलची प्रॅक्टिस करत होता. दंगलग्रस्त भागातील वातावरणात नेहमी एक विचित्र 'टेन्सनेस' असतो, त्याची पुसटशी छायादेखील शिराझ युनिव्हर्सिटीच्या कॅम्पस्‌मध्ये जाणवत नव्हती.

हैदरी न बोलता गाडी चालवत होता. सर्फराझ देखील शांत बसून होता. मी मात्र टेन्स होतो. उगाचच शोधक नजरेनं चौफेर पहात होतो. माझ्यातील जागा झालेला वार्ताहर, ट्रेन्ड शिकारी कुत्र्याप्रमाणे वास घेण्याचा प्रयत्न करीत होता; पण काहीच गवसत नसल्यामुळे काहीसा गोंधळून देखील गेला होता.

युनिव्हर्सिटीला दोन फेऱ्या मारून झाल्यावर सर्फराझनं विचारलं-'घरी जायचं?' मी नाराजी लपवीत म्हणालो – 'बा ऽ ऽ ले, असं खुळ्यासारखं फिरून वेळ दवडण्यापेक्षा घरी जाऊन आराम करणं केव्हाही शहाणपणाचं – आपल्याला त्या ट्रकड्रायव्हरनं किंवा ट्रक ड्रायव्हरच्या नावानं ह्या हैदरीनं नक्की थाप मारली! ... इथे तर दंगलीचा मागमूसही दिसत नाही!... हैदरीचा हा जोक असावा!'

'नो, आगा-ए-विजे, नो जोक – ट्रकड्रायव्हरनं मला सांगितलं तेच मी तुमच्या कानावर घातलं – नो जोक!' कुरकुर करत हैदरीनं गाडी युनिव्हर्सिटी कॅंपसच्या बाहेर काढली. सर्फराझ म्हणाला–

'घरी गेल्यावरच सत्यस्थिती कळेल. माझा धाकटा भाऊ इराज इथंच शिकतो. त्याच्याकडून सविस्तर हकीकत समजेल ..... ट्रकड्रायव्हर किंवा आपला हैदरी 'असल्या प्रकारची' बातमी जोक म्हणून देखील कधी सांगणार नाहीत ह्याची मात्र तू खात्री बाळग! असल्या अफवा पसरविण्याचं धाडस सामान्य इराणी कधीच करणार नाही! 'सावाक'-च्या पंज्यात आपली मानगूट देण्याची हौस कोणालाच नाही. अफवांवर सावाकचं बारीक लक्ष असतं! तू शिराझमध्ये गाडी शिरताच म्हणालोस – शहराचा फेरफटका करायचा आहे! – युनिव्हर्सिटी बघायची आहे!! – तुला काय बघायचं होतं ते माझ्या ध्यानात

आलं होतं ; पण तुला जे पहायला मिळेल असं वाटत होतं तसलं काहीच प्रत्यक्षात बघायला मिळणार नाही ह्याची मात्र मला पक्की खात्री होती !'

मी काही न बोलता सिगरेट पेटवली आणि खिडकीतून बाहेर पहात बसून राहिलो. थोडया वेळान सर्फराझच बोलू लागला–

'मी तुला जर सरळ घरी नेलं असतं तर तुझ्या मनात नाना प्रकारच्या संशयानी थैमान घातल असतं. सर्फराझ आपल्यापासून काही तरी लपविण्याचा प्रयत्न करीत आहे अशी तुझी समजूत झाली असती. तुझा अशा प्रकारे गैरसमज होऊ नये म्हणून मी गप्प राहिलो. आगा- ए- विजे, इराणमधील सर्व मोठ्या शहरातून तरुण विद्यार्थ्यांच्या दंगली हळूहळू वाढत आहेत हे सत्य आता कुणालाच दृष्टिआड करता येणार नाही. अनेक कारणांमुळे ही तरुणपिढी अस्वस्थ झाली आहे. त्यांना निश्चित काय हवं आहे हे मात्र कुणालाच उमगत नाही! त्याचं त्याना तरी माहीत आहे का नाही अल्ला जाणे ! —ह्या तरुणांना काबूत ठेवण्यासाठी ' सावाक 'नं मात्र खास 'अँटी-रायट' पोलिसाचं पथक निर्माण केलं आहे. त्यांना अमेरिकेला पाठवून खास शिक्षण देण्यात आलं आहे. अमेरिका स्वत.च्या देशात विचारस्वातंत्र्यावर जोर देते; पण त्याचबरोबर आमच्या येथील तरुणपिढीचं विचारस्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठी आमच्या पोलिसांना 'खास' शिक्षण देण्यात त्याना कसलीही लाज वाटत नाही ! अमेरिका फार विचित्र देश आहे. आमचे हे अमेरिकेन 'ट्रेन्ड' पोलीस दंगल झटपट आटोक्यात आणण्यात अतिशय तरबेज आहेत. हिंसक जमावावर नियंत्रण ठेवण्याचं शास्त्रोक्त शिक्षण घेतलेल्या ह्या अँटी-रायट पोलीस-पथकांसमोर ह्या विद्यार्थ्यांचा निभाव लागण सर्वस्वी अशक्य! तरुणांच्या चळवळी मोडण्याचं अत्याधुनिक तंत्र ह्या पोलिसानी अमेरिकेत अवगत केलं आहे आणि त्याच्या विरुद्ध बंडाळी करण्यासाठी रशियाच्या मदतीनं आमच्या येथील 'इस्लामिक लेफ्टिस्ट' विद्यार्थ्यांना चिथावणी देत आहेत. आज जवळजवळ पचवीस हजार तरुण तुरुगात आहेत ! —'

'पंचवीस हजार ?' मी आश्चर्यानं विचारलं.

' होय पचवीस हजार ! –' सफराझ काहीशा कडवटपणे म्हणाला– 'मागील महिन्यात प्रेसकॉन्फरन्समध्य एका वार्ताहरानं शहेनशहाला विचारल – तुमच्या तुरुगात अठरा हजार विद्यार्थी अडकले आहेत अशी अफवा आहे !'—त्या परदेशी वार्ताहराला शहेनशहानं सुनावलं –' तुमची माहिती चुकीची आहे. आमच्या तुरुंगात पचवीस हजार, ज्याना तुम्ही विद्यार्थी म्हणता असा, इस्लामिक लेफ्टिस्ट टेररिस्टाना डाबण्यात आल आहे !' बोल ह्यावर तुझ काय म्हणणं आहे ?'

मी न बोलता सिगरेट फुकत राहिलो. हैदरी तोंडातल्या तोंडात काही तरी पुटपुटत होता. थोडया वेळानं सर्फराझ खिन्न आवाजात म्हणाला—

' अरे, आज सकाळी इथं काही बंडाळी घडली आहे ह्याची सुतराम कल्पना शिराझवासियाना देखील नसणार ! विद्यार्थ्यांचा असला गोधळ इथ पाचदहा मिनिटात काबूत आणला जातो. कुणाला काही कळायच्या आत सर्व परिस्थिती आटोक्यात आणण्यात येते. फार भयंकर आहे हा सगळा प्रकार ! तो ट्रकड्रायव्हर कसं काय बोलला हेच आश्चर्य—डोळ्यानं पाहून देखील सहसा कुणी असल्या प्रकाराबद्दल चर्चा करीत नाही...आता आपण घरी गेल्यावर इराजकडूनच खरं काय ते कळेल — जर तो बोलला तर ! '

' जर बोलला तर म्हणजे ?' —मी प्रश्न केला.

' इराजला भेट–जर तो भेटला तर, म्हणजे मी काय म्हणतोय ते तुला समजेल. ह्या इराजनं आम्हाला सगळ्याना काळजीत पाडलं आहे– he is a silly angry young man.'

## सर्फराझच्या घरी

सर्फराझचं घर एखाद्या चिरेबंदी वाड्यासारखं होतं. एका भव्य लाकडी दरवाज्यासमोर हैदरीनं गाडी पार्क केली आणि दिंडीदरवाजा ओलांडून आम्ही आत शिरलो. घराच्या इमारतीसमोरील विस्तृत चौकात हरप्रकारचा फळझाडे असलेला बगीचा होता ठिकठिकाणी पितळेचे जाळीदार दिवे टागले होते. बागेच्या मध्यभागी एक कमळाकृती हौद आणि कारंजा होता.

फरसबंद पायवाटेनं कारंजाला वळसा घालून आम्ही नक्षीदार कमानीच्या व्हरांड्यात आलो. व्हरांड्याच्या छताला एक अप्रतिम झुंबर टांगलं होतं. त्याच्या हिऱ्यासारख्या लोलकातून प्रकाशाचे सप्तरंग उधळत होते. व्हरांड्याच्या एका कोपऱ्यात स्टॅंडवर नाजूक पिंजरा टागला होता. त्यामधील चिमणीसारखी दिसणारी पिवळ्या रंगाची गाणारी 'कॅनरी' आम्हाला पाहून अस्वस्थपणे इकडून तिकडे उड्या मारीत होती.

व्हरांड्याच्या पायऱ्या चढून आम्ही दिवाणखान्यात प्रवेश केला. आपल्याकडील एखाद्या घरदाज पारशी माणसाच्या घरात आल्याप्रमाणे मला वाटत होत. एका फिकट हिरव्या मखमली कोचात सर्फराझची आई आमची वाट पहात बसली होती. अतिशय नाजूक शरीरयष्टी, सुरकुतलेला काहीसा करारी वाटणारा चेहरा, पाढरेशुभ्र केस. खांद्यावरची शाल ठीक करण्यासाठी तिन हाताची हालचाल केली तेव्हा अगठीतील हिऱ्यातुन वीज साडल्याचा भास झाला! संधिवातामुळे तिला चटकन उठता येत नव्हतं.

सर्फराझनं पुढं होऊन आईला मिठी मारली आणि तिच्या हाताच, कपाळाचं चुंबन घेतलं. म्हातारीच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहात होते. मी भारावल्यासारखा उभा होतो. सर्फराझन माझी ओळख करून दिली तेव्हा मी नम्रपणे सलाम केला आणि एका कोचात विसावलो. सर्फराझ आईशेजारी बसून तिची विचारपूस करू लागला. माझे डोळे दिवाणखान्यातील चीजवस्तू न्याहाळत इराजचा शोध घेऊ लागले. सर्फराझन इराजविषयी काढलेल्या उद्गारानी माझ्या मनात कुतूहल निर्माण झाल मला ह्या अँग्री यग मॅन पाहायचा होता, त्याच्याशी बोलायचं होत–जर तो बोलायला तयार असला तर !

दिवाणखान्यातील एका दरवाजावरील पडदा हलला. पाठोपाठ सर्फराझच्या दोन बहिणी दिवाणखान्यात प्रवेश करत्या झाल्या. एक पस्तिशीची–गोड गोल चेहऱ्याची; पण बरीच स्थूल आणि बुटकी. दुसरी दहा बारा वर्षांची, अवखळ डोळ्याची, परीसारखी दिसणारी. दोघींनी सर्फराझला प्रेमानं मिठी मारून त्याच्या गालाची चुंबन घेतली आणि मला सलाम करून त्या दोघी आत पळाल्या. सर्फराझचे वडील काही कामासाठी बाहेर गेले होते. इराज अजून घरी परतला

नव्हता-तो व्यायामशाळेत 'कराटे 'ची प्रॅक्टिस करण्यासाठी गेला होता.

सर्फराझनं एका जिन्यानं मला वरच्या मजल्यावर नेलं आणि एक खोली उघडत तो म्हणाला, 'पंचतारांकित हॉटेलचा नखरा नाही, घरगुती मामला आहे, clean and simple. तू थोडा वेळ आराम कर! मी 'चायी' पाठवून देतो मग आपण 'हमाम 'ला जाऊ!'

मी पायातले बूट काढले आणि आरामखुर्चीत बसून सिगरेट पेटवली. खोली प्रशस्त आणि हवेशीर होती. भिंतीवर फिकट गुलाबी रंगाचा वॉलपेपर लावला होता. जमिनीवर मोतिया रंगाचा, निळसर नक्षी असलेला भारी गालीचा अंथरला होता. खिडकीसमोरील भिंतीला लागून पांढरीशुभ्र चादर घातलेली बिछानावजा बैठक होती. एका कोपऱ्यात पाश्चात्य डिझाइनचं टेबल आणि दोन नाजूक खुर्च्या, दुसऱ्या कोपऱ्यात छोटसं वॉशबेसिन आणि पाण्याची सुरई.

दारावर टक्‌टक् करून सर्फराझची छोटी बहीण आत आली. फळानं भरलेला ट्रे तिनं टेबलावर ठेवला. एका पांढऱ्याशुभ्र रुमालावर फळं कापण्याची सुरी आणि प्लेट ठेवत ती वळली तेव्हा मी तिला नाव विचारलं. अवखळ डोळयांतून मिस्किल हसू सांडत, गोबऱ्या गोबऱ्या गालांना खळी पाडत काहीसं लाजत 'फरिश्ते' असं उत्तर देऊन ती पळाली. मला एकाएकी घराची आठवण झाली; पण मला घर होतच कुठं?-बँकॉकला मी एकटा, बॅचलर अपार्टमेंटमध्ये, बायको आणि चार लेकी कोसबाडला! हे असं किती दिवस फिरायचं?

माझी ब्रीफकेस, सुटकेस वगैरे सामान घेऊन दाणदाण पावलं टाकीत हैदरीनं खोलीत प्रवेश केला. माझा चेहरा पाहून त्यानं काळजीनं विचारलं-' आगा-ए-विजे 'ची शुदे-शुमा सर्मा खुर्दी?' मी मानेनंच नकार दिला. हातातील सामान एका कोपऱ्यात ठेवत हैदरीनं चौकसपणं खोलीचं निरीक्षण केलं. जमिनीवरील गालिच्याचा एक कोपरा उलटापालटा करून पाहात 'वाह् वाह्-वाह् वाह्- भयंकर किमती गालीचा!' असं पुटपुटत, ट्रेमधील दोन-तीन फळं उचलत-'मी खाली वाट पाहतो' असं सांगून तो गेला.

फरिश्तेनं आणलेला सुगंधी जास्मीन चहा पिऊन तिला 'खैली खैली मामनून' (धन्यवाद) म्हणत मी गाडीपाशी आलो. सर्फराझ माझी वाटच पाहत होता. इराणमधील 'हमाम 'बद्दल मी पुष्कळ ऐकलं होतं. आज प्रत्यक्ष अनुभवणार होतो.

'हमाम' म्हणजे सार्वजनिक स्नानगृहे. फार पुरातन काळापासून ही प्रथा इराणमध्ये रूढ आहे. इराणच्या शहांनी मोठमोठ्या मशिदी आणि कॉरवांसराई बांधल्या. त्याचप्रमाणे प्रशस्त 'हमाम' देखील बांधले. इस्फहानमधील काही दोन-तीनशे वर्षांपूर्वी बांधलेले 'कदिमी हमाम अजूनही वापरात आहेत. शिराझमध्ये आम्ही गेलो तो हमाम मात्र नवा होता. इमारत एखाद्या बैठ्या गेस्ट हाउससारखी.

स्वागतकक्षामध्ये गेल्यावर सर्फराझनं प्रत्येकाचं दोन 'तुमान 'चं तिकीट काढलं. माझ्यासाठी त्यांनी एक 'स्पेशल' तिकीट घेतलं. एका सेवकानं आम्हाला कपडे बदलण्याची खोली दाखवली. तिथं प्रत्येकी दोन पांढरेशुभ्र भट्टीचे टॉवेल आणि साबणाची एक वडी आम्हाला देण्यात आली. कपडे हँगरला अडकवून, कमरेला टॉवेल गुंडाळून मी एका सेवकापाठोपाठ आंघोळीच्या खोलीपाशी आलो

प्रत्येकाला स्वतंत्र खोली. खोलीच्या छताजवळील जाळीवजा खिडक्यांतून हवा खेळत होती तरी देखील पावाच्या भट्टीसारखी उष्णता जाणवत होती. पांढऱ्या टाइल्स लावलेलं हे स्नानगृह होतं. मात्र अतिशय स्वच्छ! एका बाजूला तीन फूट उंचीचा, दोन फूट रुंद आणि सहा फूट लांबीचा संगमरवरी ओटा होता.

## उस्ताद....संगमरवरी ओटा....

एका सेवकानं गरम गरम पाण्यानं भरलेल्या दोन मोठ्या बादल्या आणून ठेवल्या. मी पाण्यात हात घालून पाहिला. चांगलाच चटका बसला! पाणी भलतंच कढत होतं. एवढ्या कढत पाण्यानं आंघोळ कशी काय करायची? मला गार पाणी पाहिजे म्हणून मी सेवकाला सांगितलं. तो हसत हसत 'चश्म्-चश्म्' (ठीक आहे-याब अशा अर्थानं) म्हणाला आणि क्षणभरातच त्यानं आणखी एक बादली उकळतं पाणी आणि हंडाभरून थंड पाणी स्नानगृहात आणून ठेवलं.

मी कमरेचा टॉवेल सोडून आंघोळीला सुरुवात करणार इतक्यात हातामध्ये कसल्या तरी तेलाची बाटली घेऊन, पीळदार शरीरयष्टीचा, साठीच्या वयाचा, 'उस्तादा 'प्रमाणे दिसणारा इराणी स्नानगृहात आला. अर्धवट सोडलेला टॉवेल मी झटकन पुन्हा कमरेभोवती गुंडाळून घेतला. हे आमचं 'स्पेशल' तिकीट असावं ह्याचा मला अंदाज आला. आता पुढं काय?-काय होईल ते पाहायचं! दुसरं काय करणार!! अशा वेळी भाषेची अडचण प्रचंड जाणवते.

'उस्तादा 'नं मला एकदा आपादमस्तक न्याहाळलं. माझ्या सुटलेल्या पोटावर चापटी मारत त्यानं नापसंतीदर्शक मान हलवली. स्वत:चं वज्रासारखं कठीण पातळ पोट मला दाखवलं दंडाच्या बेटकुळ्या काढून दाखवल्या. मला उगाचच माझ्या तुंदिलतनू शरीराची लाज वाटू लागली. मनातल्या मनात ठरवलं, 'एवढा दौरा संपला की, रेग्युलर व्यायाम सुरू करायचा आणि प्रथम ओघळणाऱ्या पोटाचा बंदोबस्त करायचा.' उस्तादमहाशयांना माझा विचार समजला असावा. त्यानं खुशीत येऊन माझ्या पाठीवर थोपटत धपाटावजा शाबासकी दिली आणि बादलीतील गरम पाणी संगमरवरी ओट्यावर ओतलं.

संगमरवर तापला. उस्तादानं मला टॉवेल काढून त्या ओट्यावर आडवं पडण्याची सूचना दिली. मी मनातल्या मनात 'जय शंभो' म्हणत वाफाळलेल्या संगमरवरावर अंग टेकलं आणि ताडकन उडालो! म्हातारीची बोरं चोरून खाणाऱ्या कोल्ह्याप्रमाणे-'कुल्ले शेकले' ऐसी स्थिती जाहली! मी ओय् ओय् करून बोंब ठोकली. उस्ताद गदगदून हसला! मला राग आला. काय व्हायचं ते होऊ दे म्हणून धीर करून मी ओट्यावर आडवा झालो. त्यानंतर अर्धा तास उस्तादाने मला रगड रगड रगडले. माझी सर्व हाडं त्याच्या मनाप्रमाणं 'ढिल्ली' झाल्यावर त्यानं अचानक माझ्या अंगावर बादलीभर गरम पाणी भस्कन् ओतलं. मी बोंब ठोकण्यासाठी तोंड उघडलं तेवढ्यात उस्तादानं बादलीभर थंडगार पाणी माझ्या पोळलेल्या अंगावर बदाबदा ओतलं. माझी बोंब पोटातच राहिली. श्वास वरच्यावरच अडकला!

-मी डोळे उघडले तेव्हा उस्तादजी खोलीत नव्हते. सेवकानं आणखी चार-पाच बादल्या पाणी आणून ठेवलं होत. मी मग

मनसोक्तपणे भारतीय पद्धतीनं स्नान केलं आणि अंग कोरडं करून, कमरेला टॉवेल गुंडाळून 'हलक्या शरीरानं' तरंगत तरंगत कपडे करण्याची खोली गाठली. तिथं पुन्हा उस्तादजी. म्हटलं मेलो! हा आता पुन्हा रगडणार!! पण सुदैवानं तसं काही घडलं नाही. उस्ताद नम्र चेहऱ्यानं हातामध्ये माझा शर्ट धरून उभा होता. मी कपडे केले तेव्हा उस्तादनं आदबीनं सलाम केला. मी त्याच्या हातावर 'टिप्' ठेवली आणि त्याचे आभार मानत बाहेर सटकलो. पुन्हा 'हमाम'मध्ये आल्यास चुकूनही 'स्पेशल' तिकीट घ्यायचं नाही असा मी निश्चय केला!

सर्फराझनं विचारलं–'हमाम कसा झाला?' मी म्हटलं, 'एकदम मस्त–पण हे असं मालिश रोज करून घेतलं तर माझ्या हाडाचा पार बुकणा होऊन जाईल. त्यापेक्षा बँकॉकचं टर्किश बाथ आणि मसाज नक्कीच जास्त सुखाचं!'

¤

व्हिएतनामच्या युद्धामध्ये जेव्हा अमेरिकेने प्रत्यक्ष भाग घेतला तेव्हा लढाई करून थकलेल्या सैनिकांच्या श्रमपरिहारासाठी बँकॉकची निवड करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर अमेरिकन सैनिक बँकॉकमध्ये 'विश्रांती'साठी येत. व्हिएतनामच्या दलदलित व्हिएतकॉंगसारख्या धूर्त शत्रूबरोबर युद्ध करून थकलेल्या अमेरिकन सैनिकाचा केवळ विश्रांतीनं श्रमपरिहार होण्यासारखा नव्हता. विश्रांतीबरोबरच करमणूक आणि मनोरंजनाची आवश्यकता होती. बँकॉकमध्ये पाहता पाहता वेश्यागृहे, नाइट क्लबस, बारस्, कॅसीनो वगैरे सोयी निर्माण झाल्या. त्यापैकीच टर्किशबाथ आणि मसाज ही सोय. ह्या टर्किशबाथस् आणि मसाजहाउसेस् म्हणजे बँकॉकची स्पेशालिटी. खुद्द टर्कीमध्ये देखील अशा प्रकारची स्नानगृहे नसतील!

बँकॉकच्या टर्किशबाथ आणि मसाजगृहात स्वागतकक्षात एक काचेची पारदर्शक भिंत असते. त्या काचेआड अनेक थाय तरुणी बसलेल्या असतात. प्रत्येकीच्या अंगात सफेद एप्रन आणि त्यावर नंबर. आपल्याला पसंत पडेल त्या नंबरची निवड करायची. काउंटरवर पैसे टाकायचे आणि निवडलेल्या तरुणीपाठोपाठ स्नानगृह गाठायचं. स्नानगृहात फोमची मऊमऊ गादी असलेलं एक टेबलवजा शयनासन, भलं मोठं बाथ-टब्–शॉवर वगैरे.

फोमच्या शयनासनावर कपडे काढून आडवं व्हायचं आणि तासभर 'ट्रेन्ड' हातानी केलेल्या मसाजचं स्वर्गसुख अनुभवायचं. ज्याला हवं असेल त्याच्यासाठी 'स्पेशल' मसाजची पण सोय. त्यानंतर टबमधील फेसाळलेल्या पाण्यानं स्नान वगैरे.

बँकॉकचं वर्णन ऐकून सर्फराझ आणि हैदरी चाईला येत म्हणाले–'आगा-ए-विजे, थायलंडमध्ये ॲग्रिकलचरल मार्केटिंगचं काम असलं तर आम्हाला बोलवून घे!'

¤

'हमाम'नंतर ताजेतवाने होऊन आम्ही घरी परतलो आणि दिवाणखान्यात सर्फराझच्या वडिलांशी गप्पा मारत बसलो. त्यांचं वय साठीच्या आसपास असावं. दिसायला ते एखाद्या कोकणस्थ ब्राह्मणासारखे होते. शिराझ युनिव्हर्सिटीत ते पर्शियन भाषा शिकवायचे–मागील वर्षीच निवृत्त झाले होते. जमीनजुमला भरपूर. शहरात दोन तीन मोठ्या इमारती. एक पुस्तकांचं दुकान आणि इतर व्यापार. फ्रेंच भाषेवर त्यांचं प्रभुत्व. इंग्रजी मोडकंतोडकं. उर्दू भाषेचं जुजबी ज्ञान. अमीर खुसरो देहलवीची बरीचशी शायरी मुखोद्गत. त्यांच्या मते ही शायरी पर्शियन कवितेच्या तुलनेत 'कम्‌अस्सल' दर्जाची. मला अमीर खुसरो देहलवीचा एकही शेर माहीत नसल्यामुळं मी गप्प. जे माहीत नाही त्याबद्दल बोलायचं तरी काय?–मनात मात्र ठरवलं की, वेळ मिळाला की अमीर खुसरो देहलवी वाचून काढायचा. हिंदमधील एखाद्या शायरकडून समजावून घ्यायचा. शिराझमधील एका पर्शियन भाषेच्या प्रोफेसरला अमीर खुसरोची शायरी माहीत आहे आणि आपल्याला अमीर खुसरो कोण हे देखील माहीत असू नये ह्या जाणिवेनं मी काहीसा खजिल झालो होतो. शुद्ध फार्सी कवितेपेक्षा अमीर खुसरो देहलवी फार्सीमिश्रित उर्दू शायरी भाषाशास्त्राच्या दृष्टीनं 'कम्‌अस्सल' असेलही–पण एका पर्शियन भाषेच्या प्रोफेसरनी ती शायरी मुखोद्गत केली होती म्हणजे त्यातील 'खयालात' किंवा 'तसव्वूर' श्रेष्ठ दर्जाची असणार हे निर्विवाद.

## साआदी – जुना आणि नवा?

साआदी आणि हाफीजच्या काही ओळी ऐकवून सर्फराझचे वडील उठले आणि आपल्या 'खासगी' खोलीत गेले. त्यांना अफूसेवनाची सवय. त्याची 'दम' मारण्याची वेळ झाली होती. मी आणि सर्फराझ खारावलेले पिस्ते खात व्होडका पीत आपआपल्या विचारात हरवल्यासारखे बसून राहिलो. अंग रगडून मालिश आणि गरम पाण्याच्या 'हमाम'नंतर सपाटून भूक लागली होती. स्वयंपाकघरात भाजल्या जाणाऱ्या कबाबचा खुसखुशीत वास दिवाणखान्यात पसरत होता. पोटात जाणारी व्होडका भूक भडकवत होती.

सर्फराझच्या वडलाना संध्याकाळी किंवा रात्री कुणी 'डिस्टर्ब' केलेलं सहसा आवडत नसे. अफूच्या नशेत साआदी आणि हाफीजची याद काढत एका गूढ स्वप्नात रमण्याची त्याची ही वेळ–पण सर्फराझ खूप दिवसांनी आला होता आणि मी 'हिंदी' म्हणून आपल्या खासगी खोलीत 'दम' मारून झाल्यावर ते पुन्हा आमच्याशी गप्पा मारायला येऊन बसले. मी विचारलं–

'इराज अजून आला नाही वाटतं?'

सर्फराझच्या वडिलांनी माझ्याकडे बराच वेळ टारवटलेल्या भेदक डोळ्यांनी पाहिलं. त्यांच्या नजरेतील अर्थ समजणं कठीण होतं. सर्फराझ रिकाम्या ग्लासमध्ये व्होडका ओतत म्हणाला–साआदी आणि हाफीजच्या गूढ कवितांचा माझ्या वडिलांनी खूप अभ्यास केला आहे–ह्या दोन महाकवींबद्दल अधिकाराने बोलू शकणारे जे थोडे इराणी आहेत त्यात माझ्या वडिलांचा नंबर 'अव्वल' आहे–

सर्फराझनं इराजचा विषय कौशल्यानं टाळला होता. मला तर इराजला भेटण्याची, त्याच्याशी बोलण्याची प्रचंड उत्सुकता लागून राहिलेली. मी व्होडकाचा घुटका घेत म्हणालो–'मला ह्या महाकवींचं सूफी तत्त्वज्ञान किंवा गूढवाद कितपत समजेल कुणास ठाऊक...पण मला साआदी किंवा हाफीज ह्यांच्या जमान्यात इराणमधील सामाजिक परिस्थिती कशी होती ह्याबद्दल जाणून घेण्याची मात्र इच्छा आहे–

लालबुंद डोळ्यांनी माझ्याकडे एकटक पहात सर्फराझचे वडील म्हणाले–'साआदी एकशे आठ वर्षे जगला. ११८४ साली जन्मला

आणि १२९२ साली सुदाला प्रिय झाला. एका कवितेत तो म्हणातो– ' दहा दारवीश (सूफी दरवेशी) वेळ पडल्यास एका घोगड्याखाली झोपू शकतील; पण दोन राजे एका प्रदेशात कधीच नांदू शकणार नाहीत ! दुसरी एक कथा ऐक–एका राजानं दारवीशला विचारलं- ' नमाझ पढण्यापेक्षा दुसरी उत्तम गोष्ट कोणती ?' तो दारवीश उत्तरला, ' हे राजा, तुझ्याबाबतीत सर्वोत्तम गोष्ट म्हणजे निद्रा! कारण तू जेव्हा झोपेत असशील तेव्हा तरी प्रजाजनांना चार घटका सुखात जगता येईल !' आता ह्यावरूनच तू तात्कालिन परिस्थितीचा अंदाज बांध !'

साआदीच्या जमान्यात जुलमी राजवट असणार हे उघड; पण इराणमध्ये जुलमी राजवट नव्हती केव्हा ? साआदीनं अशी कविता किंवा लिखाण करण्याचं मनोधैर्य तेव्हा दाखवलं हे निश्चितच गौरवास्पद आहे. सर्वसाधारणपणे कवी किंवा लेखक ह्यांनी राजकर्त्यांवर स्तुतिसुमने उधळण्याची रीत आहे. ' भाटां 'ना नेहमीच राजाश्रय. जुलमी राजकर्त्याचं ' डोकं ठिकाणावर आणण्यासाठी किंवा त्याचे डोळे उघडण्यासाठी ' एखाद्या विचारवंतानं मद्य किंवा पद्यरचनेतून एखादा वस्तुस्थितीनिदर्शक विचार मांडण्याचा प्रयत्न केला तर शिरच्छेद हेच उत्तर ! असं असूनही साआदी जर इतक्या सडेतोडपणे त्या काळी आपले विचार प्रकट करू शकत असेल तर त्याच्यापासून स्फूर्ती घेण्यासारखं बरच काही असावं हे निःसंशय.

इराणचा शहेनशहा मोहम्मद रेझा शहा पहलवी ह्याच्या अमेरिकन ट्रेन्ड्' साथाकनं इराणमधील एका नवकवीला आणि तरुण गायकाला अटक केल्यामुळं शिराझमधील विद्यार्थ्यांनी दंगल केली होती. हा अटक झालेला तरुण नवकवी नूतन साआदी तर नसेल ? सर्फराझच्या वडिलांना त्याबद्दल काही कल्पना असण्याची शक्यता ?

मी आतुरतेनं इराजची वाट पहात होतो. मला उगाचच वाटत होतं की इराजला हा नूतन साआदी माहीत असणार–मुखोद्गत असणार ! शिराझचा साआदी शतायुषी होता. हा तेहरानचा नूतन साआदी अल्पायुषी तर ठरणार नाही ? मनातील विचारांचा गोंधळ लपवत मी सर्फराझच्या वडिलांना उद्देशून म्हणालो–

' मला इराणच्या पौराणिक, अर्वाचीन आणि मध्ययुगीन इतिहासाबद्दल खूप आकर्षण आहे...त्या त्या काळचा धर्म, सामाजिक चालीरीती, व्यवहार–व्यापार हे सगळं जाणून घेण्याची माझी इच्छा आहे. इराण-अफगाणिस्तानचा सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास समजला तर हिंदच्या इतिहासातील अनेक कोडी उलगडतील असं मला वाटतं.'

सर्फराझच्या वडिलांच्या नजरेतील भेदक भाव बरेचसे निवळले. कदाचित अफूची धुंदी उतरल्यामुळं डोळ्याची एकटक भेदकता कमी झाली असेल. किंचित हसून ते म्हणाले–' तू आमचा इतिहास अभ्यासून हिंदमधील कोडी सोडवायची म्हणतोस आणि आम्ही म्हणतोय की जोपर्यंत हिंदच्या असली इतिहासाचा शोध लागत नाही तोपर्यंत आमची कोडी सुटणार नाहीत ! अजीच ते पाच हजार वर्षांपूर्वीच्या मानवाच्या इतिहासाबद्दलची खरीखुरी माहिती जोपर्यंत प्रकाशित होत नाही तोपर्यंत ही कोडी सुटणार नाहीत !

—आणि स्वत:शीच काही तरी पुटपुटत ते ' खासगी ' खोलीमध्ये अफूचा ' दम ' मारून साआदी आणि हाफीजशी हितगुज करण्यासाठी गेले.

सर्फराझच्या आईनं जेवण तयार असल्याची आणि ' पामावर बसण्याची ' सूचना दिली तेव्हा आम्ही उठलो. इतका वेळ अदृश्य झालेला हैदरी जादुगाराप्रमाणे प्रकट झाला आणि आम्ही डिनर टेबलाभोवती बसलो.

टेबल भरून पदार्थ होते. सर्फराझची आई आग्रह करत होती. माझी प्लेट काठोकाठ भरली होती. हैदरी एकटाच बडबडत होता. सर्फराझ स्वत:शीच हरवल्याप्रमाणे अन्न चिवडत होता. मी एकाग्र चित्तानं जेवत इराजची वाट पहात होतो.

मला ह्या इराजला भेटायचं होतं. त्याच्याशी दिलखुलास गप्पा मारायच्या होत्या; पण हा इराज भेटणार का ? भेटला तर बोलणार का ? बोलला तर मन उघडं करणार का ?

—नुसतेच प्रश्न ! सर्फराझची आई आग्रह करीत होती आणि मी ह्या पहिल्यावहिल्या असली इराणी आदरातिथ्यानं भारावून गेलो होतो.

[ क्रमशः ]


आवृत्ती संपत आली....

जनांचा प्रवाहो चालिला

लेखक :
विनय हर्डीकर

मूल्य :
वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

कथा

# रुपयाची नोट....!

सौ. मन्दा विजय टेंबे

डॉ. सुचरितनी आपल्या गाडीचा वेग आणखी वाढविला. वेगमापक आता थरथरत ७० च्या पुढे सरकत होता. वारंवार मनगटावरच्या घड्याळात ते पहात होते. साडेचारपूर्वी मुक्कामी पोचणे त्यांना आवश्यक होतं. आदर्शवाडीच्या बालसुधारगृहाच्या रौप्यमहोत्सवाचे ते प्रमुख पाहुणे होते. अंजलीने—आपल्या पत्नीने आपल्याबरोबर मुलांसह यावं अशी त्यांची फार इच्छा होती. त्यांना जरा बाहेरच्या जगाची कल्पना यावी, आईवडिलांचं छत्र नसलेली गरीबांची मुलं आश्रमाच्या करड्या शिस्तीत कसं जीवन कठतात हे त्यांना दाखवावं. एरवी हस्तीदंती मनोऱ्यात राहणाऱ्या राजपुत्रासारखे आपल्या मुलांचं जीवन! बंगला, गाडी आणि स्कूल या बाहेरचं जग त्यांना जवळून दिसावं असं त्यांना फार फार वाटलं; पण अंजलीनं त्यांना साफ नकार दिला होता. खर म्हणजे तिच्याच हस्ते पारितोषिकवितरण व्हावं अशी गुरुजीची फार इच्छा होती व तशी कळकळीची विनंतीही त्यांनी आश्रमाच्या वतीनं केली होती; पण आदर्शवाडीसारख्या भिकार खेड्यात एक दिवसही यायची अंजलीची इच्छा नव्हती! मुलांना न्यायला तर तिचा सक्त विरोध होता. आदर्शवाडीच्या रौप्यमहोत्सवापेक्षा ब्युटी पार्लरला ठरलेली वीकली अपॉइंटमेंट तिला जास्त महत्त्वाची वाटत होती. मुलांना कोणता तरी ग्रेट गॅबलर नावाचा ढिशॉंव, ढिशॉंव सिनेमा पहावयाचा होता. डॉक्टरनी मग फारसा आग्रह धरलाच नाही. जाऊ देत, करू देत हौस! त्यांच्या नशिबानं त्यांना सारं काही मिळालं आहे. मग कशाला त्यांना आदर्शवाडीचं जीवन दाखवून सिद्धार्थासारखा त्यांचा भ्रमनिरास करायचा? करू दे स्वप्नरंजन त्याना. खेळू दे मखमली हिरवळीवर! डॉ. आदर्शवाडीला पोचले. गुरुजी त्यांची वाटच पहात होते. डॉक्टराचे खांदे प्रेमाने धरून त्यांनी त्यांना आश्रमाचे इमारतीकडे चालविले. अल्पोपहार घ्यायचे नाकारून डॉक्टरनी सारा आश्रम पहायची इच्छा व्यक्त करताच गुरुजीनी त्यांना एकेक दालन दाखविण्यास सुरुवात केली. मुलानी फुलविलेल्या बागीच्यातील डवरलेले टपोरे गुलाब पाहून डॉक्टराचा प्रवासाचा शीण क्षणात नाहीसा झाला. मुलांनी लावलेला भाजीपाला, कचऱ्यातून निर्माण केलेल्या सुंदर वस्तू पाहून डॉक्टराचं रसिक मन मोहरलं. मुलांनी क्रीडा नाटयस्पर्धातून मिळविलेली बक्षिसे, चितारलेली निसर्गदृश्ये, सारे सारे गुरुजी मोठ्या अभिमानाने दाखवीत होते. वयाच्या मानाने गुरुजीचा उत्साह दांडगा होता. चाल ताठ होती. पावले तुरुतुरु पडत होती. आश्रमात वाढलेल्या पण आता समाजात प्रतिष्ठा पावलेल्या व्यक्तीचे फोटो, पत्ते आदि नोंद असलेले एक बाड डॉक्टरांच्या हाती त्यांनी दिले. डॉक्टर सावकाशपणे एकेक फोटो निरखीत होते. त्याची पूर्वपीठिका वाचीत होते. पाने उलटता उलटता त्यांचा चेहरा गंभीर होत गेला.

सारे पाहून झाल्यावर विद्यार्थ्यांची मानवंदना स्वीकारीत गुरुजीनी डॉक्टराना, व्यासपीठाकडे चालविले. समोर बसलेल्या बालकानी कुमार-किशोरांनी टाळ्याचा कडकडाट केला. डॉक्टरांचा परिचय करून देण्यासाठी गुरुजी उभे राहिले. डॉक्टरानी सुरुवातीलाच गुरुजीना अट घातली होती फारसा परिचय करून द्यावयाचा नाही. स्तुती तर मुळीच नको. तरीही गुरुजीनी 'डॉक्टर हे नावाप्रमाणे चारित्र्यवान, वैद्यकीय व्यवसायक्षेत्रांत अत्यंत यशस्वी, समाजप्रेमी आणि भारताचे भावी सुपुत्र वगैरे विशेषणे लावून, त्याचे अध्यक्ष म्हणून येणे म्हणजे 'मणिकांचनयोग' असे सांगितले. हे ऐकून डॉक्टर एकदम संकोचून गेले. परिचयाच्या शेवटी डॉक्टरांनी आश्रमासाठी दहाहजार रुपयाची देणगी दिल्याचेही जाहीर केले. तीन ते चार मिनिटे नुसत्या टाळ्याच वाजत राहिल्या. डॉक्टर भाषण करण्यासाठी उभे राहताच टाळ्यांची लाट विरून गेली. डॉक्टरानी हॉलभर नजर फिरविली. समोर छोटी-मोठी काळी—गोरी, किती तरी मुले दाटीदाटीने बसली होती. आपल्या उत्सुक डोळ्यानी ती पाहुण्यांकडे एकटक पहात होती. डॉक्टरांच्या मनात आले या मुलांपैकी कितीक पोरकी असतील. कितीक छोटा—मोठा गुन्हा करून येथपर्यंत पोहोचली असतील. कितीकांचा प्रवास, प्रतिष्ठेच्या बुरख्यात वावरणाऱ्या वासनाच्या कल्लोळातून एखाद्या कचराकुंडीपासून येथपर्यंन्त झाला असेल. कुणी कसे, कुणी कसे फुटलेल्या गलबतातील माल किनाऱ्यावर येऊन पडावा तसे!

एक आवंढा गिळून सुचरित म्हणाले, 'बाळांनो, तुम्हाला वाटले असेल की हा शहरातला डॉक्टर आपल्याला लांबलचक भाषण देणार, स्वच्छतेचे धडे देणार आणि सरतेशेवटी प्रत्येकाला एकेक इंजेक्शन देऊन जाणार, होय ना? पण मला माहीत आहे तुम्हाला भाषण ऐकायला आवडत नाही अन् मला भाषण करायला आवडत नाही. इंजेक्शनची सुई तर मी दवाखान्यात विसरून आलोय. आज तुम्हाला मी एक गोष्टच सांगायचे ठरविले आहे.' गोष्ट म्हणताच मुले मांड्या सरसावून बसली. डॉक्टर पुढे म्हणाले 'मी जी गोष्ट तुम्हाला सांगणार आहे, तिचे नांव आहे 'रुपयाची नोट' गोष्ट आहे तुमच्यासारख्याच एका मुलाची. त्या मुलाचं नाव होतं 'बारकू.

◻

बारकूने आपला खिसा चाचपून पाहिला. रुपयाची नोट खिशात छान बसली होती. आतापर्यंत दहा वेळा नोटेची जागा त्याने बदलली होती. एकदा शर्टाच्या खिशात, एकदा विजारीच्या, एकदा डोईवरल्या टोपीत. एकदोन वेळा त्याने ती हळूच बाहेर काढली. कोणी पहात नाहीसे पाहून, हळूच बाहेर काढली, तळहाताच्या दिवलीत धरून निरखून पाहिली. किती वेळा ती नोट तो चोरून पहात होता; पण त्याचे समाधान होत नव्हते. या नोटेचे काय घ्यायचे बरे? रात्री शंभर वेळा त्याने बेत केले, बदलले. अजून नक्की काहीच ठरत नव्हते. एकदा वाटे त्याचे काहीच घेऊ नये. ठेवूनच द्यावी म्हणजे रोज रोज पुन्हा पुन्हा पहाता येईल नाही तरी इतर पोरं फारच गमजा करतात. दर महिन्याला कुणाचा आजा, कुणाचा मामा काही ना काही देत असतात. आपल्याला कधीच कुणी काही दिले नाही. कुणी कधी भेटायलाही येत नाही. त्याच्या दूरच्या काकाने म्हणे त्याला येथे आणून टाकले होते. त्याला नीटसे आठवत नव्हते. त्याचे आईवडील कोणत्या तरी साथीत दगावले. काकाने घर व शेत विकले आणि बारकूची रवानगी आश्रमात झाली!

पण कसे काय अक्रीत घडले आणि त्याचा तो लांबलाबचा काका, मुंबईत राहाणारा, त्याला काल भेटायाला आला. गुरुजीनी जेव्हा

बारकूला निरोप पाठविला ' तुझे काका तुला भेटायला आलेत ' तेव्हा बारकू हरवून गेला. एखादं रानातलं भेकरू उडया मारीत यावं तसा तो आला. खोलीच्या उंबऱ्यात उभा राहिला. त्याचा तो काका खुर्चीत पायावर पाय टाकून बसला होता. छपरी करडया मिशा, गरुडासारखे नाक, उजव्या कानशिलावर चण्याएवढा एक चामखीळ, डोळे रिठयाच्या बीसारखे काळे. घगघगीत टाचणीसारखी आत टोकदार नजर, डोक्यावर काळी टोपी - पांढरे धोतर. बारकूकडे तो बसल्या जागेवरून पहात होता. बारकूच्या डुईपासून तो अंगठयापर्यंत, नजर बस्तऱ्यासारखी दोन-तीनदा फिरवून, काका मख्खपणे बसून राहिला. बारकूला वाटले काका जवळ बोलावील, पाठीवरून हात फिरवील, अगदीच नाही तर छपरी मिशातून रुंद हसेल —पण छे ! गुरुजीच सांगू लागले, 'बारकू सर्व मुलांत हुशार आहे. शिस्तीत राहातो' काका ऐकले न ऐकलेसे करीत खेकसल्या आवाजात म्हणाला, 'बारक्या नीट वाग, घराण्याचे नाव काढ, जन्माला आलास तो आयशी-बापसाला उलथून-फुटक्या नशिबाचा! म्हणून काका खिडकीबाहेर पचकन थुंकला. गुरुजी सुन्नच झाले. काका पुढे म्हणाला, 'तसा माझा अन् याच्या बापाचा संबंध नावापुरताच. त्याच्या माझ्यात चार चुली हायती, उगच माझ्या गळयाला घोर नको म्हणून इथं आणून टाकला होता. घराचा वेव्हार मी केला; पन याच्या बापाचं कर्ज पन फिटलं नाय त्यातून !' बारकूला वाटलं आपल्याला आता रडू येणार, पण रडं तसंच त्यानं उरात दाबून ओठ दातांखाली धरला. काका गुरुजींना सांगत होता 'आलतो गावात जमिनीच्या कामासाठी, म्हटलं जाऊन बघू तरी पोर काय करतोय की कुठं उकिरडा फुंकतोय तो. जातो मी— बारक्या इकडे ये!' बारकू भीत भीत जवळ गेला. आता हा काका आपला कानपीन पिळतो कीकाय असं त्याला वाटले. काकानं खिशातून पाकीट काढलं, पाकिटात बऱ्याच नोटा असाव्यात. बराच वेळ काका नोटा बाहेर काढून उलटमुलट करून पहात होता. नंतर एक नोट काढून बारकूच्या हातात कोंबीत म्हणाला, हा घे रुपया खाऊला ! मग गुरुजींकडे पहात ऐसपैस हसत म्हणाला, 'हो लांबचा का हुईना पण पुतन्या हाय माजा, रिकाम्या हाती चुलता आला असे व्हाया नको!' अन् तट्कन उठत, पायतणे कर्रकर्र वाजवीत काका मागे न पाहता निघून गेला. गुरुजी टेबलावर कोपरे टेकून एकटक बारकूकडे पहात होते. त्याच्या पाठीवरून मग हात फिरवीत म्हणाले, 'जा बारकू, काकाने रुपया दिलाय ना, त्याचे तुला हवे ते घेऊन खा ! पेन्सिल-वही असले काही घेऊ नको हं !' गुरुजीच्या पायाला हात लावून बारकू आपल्या खोलीत आला. आता ही नोट कुठं ठेवावी ? कुणी चोरली-बिरली तर ! रात्रभर त्याने ती आपल्या उशाखाली ठेवून दिली. सकाळी उठताच प्रथम नोट पाहिली. अगदी चपटी होऊन गेली होती तो नोटेकडे पाहून हसला. जणू ती नोट त्याच्याकडे पाहून हसत होती. दोघांच्यात काही गुजगोष्ट चालली होती. काय बरे घेऊ या नोटेचे? चणे, रेवडया की खारे शेंगदाणे, की लिमलेटच्या गोळया, की पाव-बटर? तो शंकर नेहमी प्रार्थनेच्या वेळी खिशातून चणे काढून खातो व आपल्याला अंगठा दाखवून टुक टुक करतो. आपणही आज त्याला असंच करू. मग लेकाचे तीन तीन वेळा पाय धरतील. त्या वेळी, चागले पाणी तोंडाला सुटले की चिमटीभर चणे द्यायचे. रुपयाचे मस्त पेरूच घेतले तर! पाच येतील; पण पेरू का चार दिवस टिकणार? बारीक शेव-भजी घेतली तर ! नाही तरी नेहमी आपल्याला नुसता खमंग वास पोटभर मिळतो. नाही तर तसे नकोच. चणे-चुरमुरे-दाणेच घ्यावेत. चार आण्याचे चुरमुरे, आठ आण्यांचे चणे अन् चार आण्याचे खारे दाणे ! सारा हिशेब मनाशी जुळला. बस्स! ठरले. आजच स्टँडसमोरच्या दुकानात जाऊन घ्यायचेच सारे.

बारकूला मग अभ्यास सुचेना. दुपारची सुट्टी होताच कोणालाही बरोबर न घेता तो हळूच दुकानाकडे निघाला. तीन-चार वेळा नोट काढून पाहिली, हळूच नोटेचा मुका घेतला. ती आता दुकानदाराला द्यावी लागणार म्हणून त्याला वाईट वाटले. आता दुकान जवळ आलं होतं. काचेच्या पेटीतले चणे दाणे आता त्याला खुणावू लागले होते. दुकानदार गल्ल्यावर पेंगत बसला होता. बारकू खाकरला. दुकानदार दचकून जागा झाला अन् म्हणाला, 'काय हवंय-रे पोरा?' 'चार आण्याचे चणे, चार आण्यांचे दाणे अन् आठ आण्याचे चुरमुरे! ' बारकू पाठ केल्याप्रमाणे बोलला. ' अगूदर पैसे टाक, मग देतो !' दुकानदाराने हात पुढे केला. बारकूने फळीवर ठेवलेली नोट पाहताच 'भोवनी चागली झाली!' असं म्हणून खूष होऊन दुकानदारानं सुरळया बांधल्या. बारकूनं तिन्ही सुरळया जपून उराशी धरल्या. चणे नुकतेच भट्टीतून आले असावेत. चण्यांची ऊब त्यासा सुखावत होती. चार दाणे तोंडात टाकावेत असे त्याला वाटलं; पण त्याचं दुकानदाराकडे लक्ष गेलं. दुकानदार नोट उभी आडवी धरून पहात होता. एकदा डोळे बारीक करून त्यानं ती अधांतरी उजेडात धरली आणि काय होतंय हे समजायच्या आत त्याने बारकूची मान पकडली. बारकूच्या दोन्ही हातात सुरळया धरलेल्या होत्या. मान दुकानदारानं चागलीच आवळली होती. त्याला धड ओरडताही येईना. बारकूचं बखोटं पकडून दुकानदार तसाच त्याला खेचीत निघाला. ' थाब तुझं टकुरच फोडतो मास्तराकडून ! खोटया बापाची पोरं तुम्ही साल्यानो. ' बारकू ओरडत होता. दुकानदारानं त्याला एखाद्या पोत्यासारखा फरफटत आणून गुरुजीसमोर आदळला. त्याच्या अंगावर नोटेचे तुकडे करून फेकीत दुकानदार ओरडला, ' मास्तर, हेच शिकविता का पोरास्नी ? गुडघ्याएवढं पोर अन् मला फशिवतंय, चक्क खोटी नोट हाय ही !' बारकूच्या हातून सुरळया हिसकावून घेत आमच्याकडे पाहून थुंकत दुकानदार निघून गेला. गुरुजी दगडी पुतळयासारखे उभे होते! जणू त्यांचे पाय मातीत पुरले गेले होते ! नोटेचे तुकडे बारकूच्या पायांशी धुळीत पडले होते ! अन् बारकू मुठीने डोळयातले पाणी पुशीत होता.

□

गोष्ट संपवून डॉक्टर खाली बसले सारीच गहिवरली होती. कुणी मुसमुसत होती, कुणाचे गाल भिजून चिंब झाले होते. डॉक्टरनी आवंढा गिळून टेबलावरील ग्लासातील घोटभर पाणी प्यालं. खिशातून चेकबुक काढलं. त्यावर आकडा लिहिला देणगीचा अन् दाटल्या गळयानं ते म्हणाले, 'बाळांनो, आज बारकूची गोष्ट तुम्ही ऐकलीत ना, – तुमच्यातही असे बारकू असतील. त्यांच्यासाठी – त्याच्या खाऊसाठी मी आज ही देणगी देत आहे !'

टाळयांचा कडकडाट झाला. गुरुजीनी थरथरत्या हातानी दहा हजार रुपयाचा चेक घेतला. त्यांची दृष्टी धूसर झाली. पंचवीस वर्षापूर्वी मातीत पडलेले रुपयाच्या नोटेचे तुकडे त्यांना चेकच्या जागी दिसू लागले आणि—आणि—डॉक्टरांच्या जागी मुठीने डोळयांतील पाणी पुसणारा एवढासा बारकू...!!

□

# पुस्तके

## सामान्यज्ञान वाढविणारी दोन अर्थशास्त्रीय पुस्तके

छाया दातार

डॉ. अनंत फडके यांची मागोवा प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध झालेली दोन नवी जुळी पुस्तके – 'भारतात दारिद्र्य का आहे ?' आणि 'भांडवली अर्थव्यवस्था' – दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. प्रथम 'भारतात दारिद्र्य का आहे ?' हे वाचावे आणि दारिद्र्य, विषमता, बेकारी या त्रिसूत्रीची मूलभूत कारणमीमांसा पटली तर 'भांडवली अर्थव्यवस्था' हे सैद्धान्तिक विचार करणारे पुस्तक वाचायला घ्यावे. फडक्यांच्या शब्दात सांगायचे 'तर भारतातील विकासप्रक्रिया जनताभिमुख नसून नफाभिमुख आहे आणि म्हणून भांडवली अर्थव्यवस्थेतील भांडवली अरिष्टाची भर पडून विकासाच्या प्रक्रियेला खोळ बसली आहे.' भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलशाही व्यवस्थेचे मार्क्सवादी दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण आहे. मार्क्सच्या मूळ 'कॅपिटल' या ग्रंथाचा आधार घेऊन आजतागायत जे जगत्व्यापी स्वरूप भांडवली अर्थव्यवस्थेला प्राप्त झाले आहे तेथपर्यंत फडके आपली मांडणी आणून पोचवतात. ते करताना अनेक लोकमानसात भिनलेल्या कल्पना ते उध्वस्त करतात. उदा. अमेरिका देशामध्ये उत्पादनाच्या साधनांवर संपूर्ण खाजगी मालकी असून खाजगी मालकीमुळे या देशामध्ये संपन्नता आली आहे. फडक्यांनी आकडेवारीने दाखवून दिले आहे की, शासकीय भांडवलशाही, शासकीय हस्तक्षेप अमेरिकेसारख्या देशातही चुकलेला नाही.

या दोन्ही पुस्तकांतील मांडणीबाबत दोन अंगांनी मतभेद व्यक्त केला जाण्याची शक्यता आहे. मार्क्सवादी विचारसरणी मानणाऱ्या आणि मार्क्सवादाचे नावही सहन न होणाऱ्या, आणि तरीही मला वाटते की प्रत्येक जागरूक नागरिकाने प्रत्येक सामाजिक, राजकीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याने ही पुस्तके आपल्या संग्रही ठेवण्यासारखी आहेत. भारतातील दारिद्र्य, विषमता आणि बेकारी याबद्दल प्रत्येक शहाण्या माणसाला काळजी वाटत असते. या तीन्ही गोष्टींची मुळे आपल्या अर्थरचनेत आहेत हेही सर्वसाधारण माहिती असते; परंतु ही अर्थरचना नेमकी कशी आहे, तिचा इतिहास काय आहे, ही माहिती महाविद्यालयीन टेस्टबुकांशिवाय कुठेही सुलभ पद्धतीने, सुटसुटीतपणे मिळू शकत नाही. उद्योगधंदे, शेती यांची वाटचाल, सत्ताधाऱ्यांनी वेळोवेळी घेतलेली धोरणे यामुळे सांभाळले गेलेले हितसंबंध हे सर्व समजून घेणे म्हणजे या अर्थव्यवस्थेचे गतिनियम समजावून घेणे. त्याचबरोबर या अर्थव्यवस्थेचा गाभाही समजावून घेणे. उत्पादनसाधनांवर मालकी असलेल्या वर्गांच्या हातात या अर्थव्यवस्थेची सूत्रे आहेत हा या विवेचनाचा निष्कर्ष.

सरकारी क्षेत्रातील उद्योगधंदे, सहकारी नियंत्रणे, सरकारी हस्तक्षेप हे या आर्थिक रचनेच्या नैसर्गिक गतीला कसे मदतकारकच होतात आणि ही गती किती जबरदस्त असते हे सत्य या सर्व विवेचनातून बाहेर पडते. दोष केवळ सत्ताधारी व्यक्तींचा नसतो. त्यांनी केलेला भ्रष्टाचार, लोकसंख्यावाढ, परप्रांतीयांचे आक्रमण ही नेहेमी दिली जाणारी लोकप्रिय कारणे केवळ रोगाची लक्षणे आहेत आणि रोगाचे मूळ जंतू नाहीत हेही या विश्लेषणातून दिसून येते. उदा. उत्तरप्रदेश, राजस्थान या मागासलेल्या राज्यांमध्ये ग्रामीण भागात १९६९ साली बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी १७९, १६९ असे होते तर जननसंख्येचे प्रमाण दर हजारी ४६ व ४४ होते. याउलट पंजाब व केरळमध्ये — बालमृत्यूचे प्रमाण ९८ व ५९ व जननसंख्येचे प्रमाण दरहजारी अनुक्रमे ३४ व ३१ इतके आहे. यावरून फडके निष्कर्ष काढतात की, भारतीय जनतेचे आर्थिक, सामाजिक मागासलेपण दूर झाल्यावर जननसंख्येचे प्रमाण कमी होईल. बेकारीच्या प्रश्नासंबंधीसुद्धा फडके दोन प्रकारचे आकडे समोरासमोर मांडतात. एकिकडे २ कोटी लोक बेकार आहेत. २ कोटी अर्ध बेकार आणि दुसरीकडे उत्पादनक्षमतेपैकी ४० टक्के उत्पादनक्षमता पडून आहे, मागणी नाही म्हणून. विषमता : १९७२ साली देशातील १० टक्के श्रीमंत लोकांना एकूण देशातील मिळकतीच्या ४० टक्के वाटा मिळत होता. उरलेल्या ९० टक्के जनतेच्या वाट्याला ६० टक्के हिस्सा येत होता. याचा अर्थ देशातील दारिद्र्याचे वाटप सरसकट नाही हे येथे नमूद होते.

### विषयाची व्याप्ती

'भारतात दारिद्र्य का आहे ?' या पुस्तकात फडके यांनी भारतीय अर्थरचनेच्या सर्व अंगोपांगांचा पद्धतशीर आढावा घेतला आहे. औद्योगिक वाटचालीमध्ये परकीय चलन, भांडवलाची चणचण, साम्राज्यशाही, भारतीय अर्थव्यवस्थेचे मागासलेपण या विषयांचा परामर्ष घेतला आहे. शेतीक्षेत्रातील वाटचालमध्ये कॉंग्रेसच शेतीसुधारणेचा कार्यक्रम, हरितक्रांती, छोट्या शेतकऱ्यांपुढे टाकलेले जाळे हे विषय हाताळून शेतीक्षेत्रातील उत्पादनक्षमता वाढविण्याच्या प्रयत्नांची मर्यादा दाखविली आहे. सरकारी क्षेत्र हा वेगळा विभाग करून सरकारी क्षेत्र म्हणजे समाजवादाकडे वाटचाल या

: मिथ 'ला फडक्यांनी सुरुंग लावला आहे. मागासलेल्या भांडवली देशात औद्योगीकरणासाठी इन्फ्रा स्ट्रॅक्चर तयार करण्यासाठी व मोठमोठ्या प्रकल्पांना लागणारे मोठे भांडवल एकत्रित करण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज अपरिहार्य असते आणि हा हस्तक्षेप भांडवली व्यवस्था सुरळीतपणे चालू रहावी म्हणूनच असतो हे भरपूर आकडेवारी देऊन फडके सिद्ध करतात. वाचकांची चिकित्सक बुद्धी जागृत करून, भरपूर 'डाटा' उपलब्ध करून वाचकांनाही निष्कर्ष काढण्यासाठी प्रवृत्त करणे हा फडक्यांचा विशेष आहे. उपसंहारमध्ये अर्थकारण व राजकारण हातात हात घालून कसे जाते ते फडके थोडक्यात दाखवतात. मात्र या सर्व परिस्थितीला कोणती उपाययोजना याबद्दल सुतोवाच करून थांबतात. त्यामुळेच या पुस्तकाचे अपील व्यापक होते. वेगवेगळी राजकीय मते असूनसुद्धा केवळ वस्तुनिष्ठ माहिती योग्य त्या : चौकटीमध्ये ' मांडली असल्याचे समाधान वाचकाला मिळते.

## मार्क्सवादी सिद्धान्तांचा परिचय

भांडवली अर्थव्यवस्था हे पुस्तक ठोस वास्तवाच्या पातळीवर न राहता अमूर्त सिद्धान्तांचा परिचय करून देणारे पुस्तक आहे. आपल्यापैकी काहीजण भांडवली अर्थशास्त्राच्या सिद्धान्तांचा अभ्यास करून समाजात चालणारे अर्थव्यवहार समजून घेतात. सर्वसामान्य माणसे अनभिज्ञपणे पण त्याच तत्त्वाच्या आधारावर व्यवहार करतात. मागणी, पुरवठा, स्पर्धा, मक्तेदारी, वस्तूच्या किंमती ठरविण्याचे तत्त्व हे शब्दप्रयोग बहुतेक सर्वांना माहिती असतात. मात्र ही तत्त्वे वापरून एक सबंध भांडवली अर्थव्यवस्थेचे अगडबंब यंत्र उभे राहिलेले आहे आणि ते आपल्या इच्छेविरुद्ध स्वतःच्या गतीने चाललेले आहे – असे हे सबंध अवकाशग्रह, तारे, सूर्य यांनी भरलेले अनंत विश्व स्वतःच्या नियमानी चालते – हे आपल्या लक्षात येत नाही. या पुस्तकाने मुख्यतः आपले सर्व व्यवहार एका दिलेल्या, चालू असलेल्या अर्थव्यवस्थेचे भाग असतात याचे भान आपल्याला दिले जाते.

भांडवली अर्थशास्त्राच्या सहाय्याने भांडवली अर्थव्यवस्था समजून घेणे आणि मार्क्सवादी अर्थशास्त्राच्या सहाय्याने समजून घेणे हे किती वेगळे आहे याचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना येत जातो. चलनवाढ, भाववाढ, तेजी, मंदी या सर्व घटनांची तात्कालिक कारणे व उत्तरे भांडवली अर्थशास्त्र देते; पण मार्क्सवादी अर्थशास्त्र या घटनांच्या मुळाशी जाऊन त्या प्रक्रियांचा शोध घेते. केवळ पृष्ठभागीय घटना आणि त्यांचे पृष्ठभागीय तर्कशास्त्र यावर समाधान मानले जात नाही. या घटनांच्या मागे असलेली उत्पादनव्यवस्थेची बैठक तपासण्याचा प्रयत्न केला जातो. उत्पादनव्यवस्था ही उत्पादनसंबंधांवर अवलंबून असते आणि ह्या उत्पादनसंबंधांचे स्वरूप कळले की, अनेक गोष्टी कळण्यास मदत होते. म्हणूनच भांडवली अर्थव्यवस्थेची सुरुवात फडके करतात, ' मूल्य म्हणजे काय ?' या प्रकरणाने.

## भांडवली मॉडेलचे गतिनियम

मूल्य म्हणजे वस्तूची किंमत, या व्यावहारिक व्याख्येपेक्षा वेगळी व्याख्या आपल्या समोर येते. भांडवलशाहीमध्ये मूल्य ही संकल्पना ' विनिमयमूल्य ' या नात्यानेच पुढे येते आणि वस्तूंच्या परस्परांशी विनिमयाची बैठक काय, सर्वसाधारण घटक कोणता तर अमूर्त मानवी श्रम आणि म्हणूनच भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये मूल्य म्हणजे वस्तू बनताना आत गेलेले, लपलेले अमूर्त मानवी श्रम. या विनिमयातून समाजातील माणसाचे परस्पर संबंध तयार होतात आणि या उत्पादनसंबंधावरच आधारित वर्गसंबंध निर्माण होतात. 'मूल्य' कल्पना समजणे भांडवलशाही समजण्यासाठी फार महत्त्वाचे आहे. याच प्रकरणात ' मूल्याचे नियम 'ही समजावून सांगून वस्तूची किंमत ही केवळ मागणी व पुरवठा या शक्तीवर अवलंबून नसते तर सरासरी किंमत ही ' मूल्या 'वरून ठरते याचे विवेचन फडके करतात. बाजारपेठेमार्फत ' मूल्याचा नियम ' ही अमानवी शक्ती भांडवलदारावरही राज्य करत असते आणि म्हणूनच भांडवलशाहीची गती व्यक्ती ठरवत नसतात. त्यांची भूमिका कमी महत्त्वाची असते. भांडवली अर्थव्यवस्थेचे आंतरिक तर्कशास्त्र असते आणि एकदा गती प्राप्त झाली की ही व्यवस्था आपल्याआपणही चालत रहाते,

या सिद्धान्तावर अवलंबून नफाप्राप्ती होत असते. चौथ्या प्रकरणात नफा का आणि कसा होतो याचे भांडवली समर्थन फडके देतात. भांडवल गुंतवण्याचा धोका पत्करला म्हणून बक्षीस किंवा उपभोग न घेता शिल्लक टाकली त्याचे बक्षीस वगैरे कल्पना या स्पष्टीकरणार्थ आणि समर्थनार्थ म्हणून येतात. त्याच्याचबरोबर फडके मार्क्सवादी विश्लेषण मांडून दाखवतात आणि उत्पादनप्रक्रियेमध्ये श्रमशक्तीचे क्रयवस्तूत रूपांतर होऊन ती विकली जाऊ लागली की त्या श्रमशक्तीची प्रत्यक्ष उत्पादनक्षमता किंवा निर्मितिक्षमता आणि त्या श्रमशक्तीचा पगाराच्या रूपाने मिळणारा मोबदला यामध्ये जी तफावत पडते त्यामध्ये नफ्याचा उगम होतो. श्रमशक्तीचा मोबदला देऊन उरलेले नवे मूल्य किंवा उत्पादन हे भांडवलदाराच्या मालकीचे होते. कारण भांडवलाने त्याने श्रमशक्ती खरेदी करून अधिकार सांगितलेला असतो. याला 'पिळवणूक' म्हणतात. यातूनच नफा मिळतो. भांडवलाच्या मालकीच्या जोरावर चोरलेले श्रम. मूळ भांडवलसंचय इंग्लंडमध्ये कसा झाला याचे मार्क्सने 'कॅपिटल 'मध्ये अतिशय सुंदर वर्णन केलेय. आकडेवारी विशेष. फडकेही थोडक्यात ती प्रक्रिया समर्थपणे पटवून देतात. याच गतिनियमामधील एक अपरिहार्य नियम ' अरिष्टाचा. ' याला अतिरिक्त उत्पादनाचे अरिष्ट म्हणतात. या अरिष्टाची लक्षणे म्हणजे एकीकडे लोकांच्या हातातील क्रयशक्ती कमी होते आणि दुसरीकडे मालाचे न विकलेले साठे पडून रहातात. गरजा असतात, माल असतो; पण त्याचा विनिमय होऊ शकत नाही. हा काळ क्रांतीला अनुकूल असतो. मात्र भांडवलीव्यवस्था आपोआप कोसळून पडत नाही. फडके ' Collapse Theory ' मांडत नाहीत. या अरिष्टातूनही पुन्हा भांडवलाची पुनर्रचना होऊन नवा समतोल साधला जात असतो याचे उत्तम विवेचन ते करतात. अनेक मार्क्सवाद्यांनी ते काळजीपूर्वक समजावून घेण्यासारखे आहे.

## आधुनिक भांडवलशाही

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात मार्क्सने वर्णन केलेले भांडवली अर्थव्यवस्थेचे मॉडेल वास्तवात हळूहळू बदलत गेले. त्याच्यामध्ये अनेक नव्या घटकांची आणि नव्या सिद्धान्तांची भर पडली व त्यानुसार आजची भांडवलशाही चालताना दिसतीय. त्या भांडवलशाहीचा वेध फडके घेतात. हा भाग बहुतेक वाचकांना रस वाटण्याजोगा आहे कारण खूप उदाहरणे, आकडेवारी, बराचसा ताजा आर्थिक इतिहास यामुळे हा भाग अमूर्त पातळीवर न रहाता ठोस वास्तव बनतो. 'साम्राज्यशाही' ची खरी बदलती स्वरूपे व आर्थिक वैशिष्ट्ये फडके नमूद करतात. आज जगभर जो असमान विकास दिसतो आणि मग श्रीमंत राष्ट्रे मदतीचा उदारपणा दाखवितात हाही या साम्राज्यशाहीचाच आणिक भाग कसा आहे आणि त्यांची श्रीमंती गरीब राष्ट्रांच्या बरोबरीत असमान व्यापारी कलमामुळे — असमान विनिमयमूल्यामुळे — कशी पोसली जाते ते अमेरिका प्रेमिकानी पहाण्याजोगे आहे. त्याचबरोबर शासकीय भांडवलशाही, कल्याणकारी राज्याची रचना ही वरवर 'साम्यवादी' अर्थव्यस्थेसारखी कल्पना दिसली तरी ते भांडवलशाहीचेच वेगळे स्वरूप (form) आहे असे फडके सिद्ध करतात आणि या वरवर कल्याणकारी व संपन्न राष्ट्रामधील अमानुषता दाखवून देतात. उदा. व्हिएतनामवरील युद्धात १९६८ साली जेवढे सैनिक मारले गेले तेवढेच कामगार (१४,३११) अमेरिकेत औद्योगिक अपघातांमुळे त्या वर्षी मरण पावले. उत्पादनक्षमता, नफा वाढविण्याच्या नादात माणसाचा जीवही जेथे मुंगीसारखा समजला जातो त्याला कल्याणकारी राज्य म्हणता येईल का ? 'युद्धखोरी' हा सुद्धा या अमानुष नफ्यावर आधारित अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे हे आकडेवारी देऊन दाखविले आहे.

अशा रीतीने सोप्या, सुलभ रीतीने आणि तरीही मूळ सिद्धान्ताचा विपर्यास न करता किंवा सुलभीकरणात अनेक बारकाव्यांचा त्याग न करता फडक्यानी भांडवली अर्थव्यवस्था आपल्या 'करतलावर' ठेवण्याचे कठीण काम पार पाडले आहे. ह्या अमानुष, स्वार्थावर चालणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये आपण जगतो आणि एकएकटे ही व्यवस्था बदलायला अपुरे पडल्याने विफल होतो – ती व्यवस्था निदान निरखून तरी बघता यावी आणि कुठे तरी तिला उध्वस्त करण्याची अनावर इच्छा सरसरून यावी – इतके जरी झाले तरी पुरे आहे. पुस्तकाच्या शेवटची दोन परिशिष्टे, घरगुती श्रमाचे स्थान आणि टेलरिझम अतिशय महत्त्वाची आहेत. स्त्रीचे घरात केलेले विनामोबदला श्रम भांडवलदाराच्या वरकड मूल्यात भर कशी घालतात आणि तीही भांडवली अर्थव्यवस्थेचा भाग कशी बनते हे पहिल्या परिशिष्टात सांगितले आहे आणि दुसऱ्या परिशिष्टात माणसाला यंत्राचाच एक भाग बनविण्याची प्रक्रिया कशी घडत असते याचा इतिहास आहे. □

---

फिनिक्स निवड

# Maugham By Ted Morgan

( Simon & Schuster )

सर्व डायजेस्टमधला इझिली डायजेस्टेबल डायजेस्ट कोणता? तुम्ही म्हणाल, 'Reader's Digest.' मी म्हणेन हे मासिक अगदी वापरून वापरून गुळगुळीत झालेल्या नाण्यासारखे आहे. अती सल्ला देणारे. गुडीगुडी.

मला सर्वात डायजेस्टेबल व टेस्टी डायजेस्ट वाटते ते बुक डायजेस्ट. माझ्या वाचनालयात या अकाचा सर्वात ताजा अंक आला आहे तो जून ८० चा. या अत्युत्तम मासिकाच्या वितरणाविषयी द कॉनॉइसूर (Connoisseur) जहांगिर आर्ट गॅलरी, मुंबई, या लेकाने अनेक लोकाना शेंडी लावली त्यातला मी एक! या लोकानी बऱ्याच लोकाना ६०–७० टक्के शेंडी लावली आहे. म्हणजे तुम्ही जर ३ वर्षांची वर्गणी भरली तर तुम्हाला फक्त एका वर्षाचे ११–१२ अंकच पाठवायचे !

जून १९८० च्या अंकात वरील पुस्तकाचा संक्षिप्त परिचय लेखकाच्याच शब्दात आलाय; पण त्याहीपेक्षा सुंदर आहेत ते मॉमचे फोटो. आत्तापर्यंत मी मॉमचे जे फोटो पाहिले आहेत ते वयस्कर म्हाताऱ्या सिनिक मॉमचे. त्यांचा विलक्षण सुरकुत्या असलेला चेहरा म्हणजे ravaged land चा कान्टूर नकाशाच ! मी पाहिलेल्या फोटोवर एकच एक्स्प्रेशन दिसे. 'त्यात काय ते मोठं ?' त्यात खालचा ओठ वरच्यापेक्षा पुढे आलेला व हनुवटी अशी काही पुढे आलेली की ते भारतीय असते तर त्यांच्या तोडात नेहमी पान आहे की काय अशी शंका आली असती, पण तसे ते तोंडात चुइंगमही ठेवत नसत. जिवणीजवळची गालफडं नेहमी फुगलेली. जणू आपण बोलताना नेहमी अडखळतो याची जाणीव ते आयुष्यभर विसरले नाहीत. या अंकात मात्र मॉम यांचे बाल्यावस्थेतील व तरुणपणातील फोटो आहेत आणि ravaged land चा सुद्धा एक भव्य सुंदर रंगीत काटूर मॅप आहे.

If in some lives there is an original sin, in Maugham's there was an original wound, from which he never recovered. हे लेखकाचेच शब्द.

हा सिनिक् ऑस्कर वाइल्डच्या homosexuality च्या प्रसिद्धीमुळे भाबावून गेला होता. आपले पितळ आता उघडे पडेल याची त्यांना नेहमी धास्ती असे. मग 'यात काय ते मोठे ?' हा एक निव्वळ बुरखाच होता तर ! होमोसेक्श्युअॅलिटीमुळे त्यांच्या अपराधी भावना वाढल्या असतील व त्यांचा तोतरेपणा (स्टेमर) आणखीनच वाढला असेल! सन १९६७ मध्ये मॉम दिवंगत झाले. उभी हयात हा सिनिक् ऑस्कर वाइल्डच्या खटल्यामुळे अस्वस्थ राहिला होता. इंग्लंडमध्ये मॉमच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी म्हणजे १९६९, मध्ये होमोसेक्श्युअॅलिटी हा गुन्हा नाही असा कायदा पास झाला. (मात्र दोन्ही व्यक्तीची त्या कार्यात समती असायला पाहिजे.) सिनिसिझम हे फक्त वरचे पातळ आवरण होते की काय ? ते क्लब–फुटेड होते.

त्यांचा स्टेमर होता. आता ते होमोही होते हे बाहेर आले आहे. या माहितीच्या प्रसिद्धीमुळे ते त्यांच्या थडग्यात सारखे कुशी फिरवत असतील. होमोसेक्शुअॅलिटीच्या अनुषंगाने याच अंकात, याच लेखात एक ऑस्कर वाइल्डचा इतका वेगळा सेन्सिटिव्ह व पर्व्हर्ट फोटोग्राफ आहे की या डायजेस्टमधले फोटो कापून त्याच्या पुस्तकात लावण्यासाठी मी त्याची एक वेगळी कॉपी घेणार आहे.

आमच्या ग्रंथालयात आत्ताच मॉमवर दुसरे एक पुस्तकही आले आहे. ‘ Conversations With Willie ’ हे त्याचे नाव. ते लिहिले आहे रॉबिन मॉम यांनी. विल्यम सॉमरसेट हे रॉबिनचे काका. या रॉबिन मॉमनेही तीन–चार पुस्तके लिहिली आहेत.

मॉमचे गायनेकॉलॉजीचे प्राध्यापकही त्यातलेच सुरुवातीसच लेक्चरमध्ये ते म्हणाले होते की, ‘ Gentlemen, woman is an animal that micturates once a day, defecates once a week, menstruates once a month, parturates once a year, and copulates whenever she has the opportunity ’. मॉमना अर्थात् हे फार आवडले. स्त्री–मुक्तिवाले हे वाचून दातओठ खातील; पण त्यांनी antidote म्हणून श्री. आनंद यादव यांचे ‘ स्पर्शकमळे ’ वाचावे. बाकी सिनिक हे नेहमीच स्त्रियांना नावे ठेवणार ! स्वतःला सुद्धा ते नावे ठेवत असतात. मग आपण त्यांचे म्हणणे चिमूटभर मिठाबरोबरच घ्यावे.

पण हा भावनाविवश न होणारा, समलिंगसंभोगवादी, बोलताना अडखळणारा व चालताना थोडासा लंगडणारा, हृदयावर नेहमीसाठी चऱ्हे असणारा माणूस गोष्टी सांगण्यात इतका पटाईत झाला की आजी आणि नातू यांच्यामध्ये लहानपणी जसा rapport निर्माण होत असतो तसा rapport वाचक आणि मॉम यांच्यात होत असे. वाचनीयता हाच जर उत्तम साहित्याचा निकष असेल तर मॉम हा एक सम्राट होता! त्यांच्यासारखे लेखी कथाकथन कुणीही केले नाही! मॉमची बांधिलकी ही केवळ वाचकाची करमणूक करण्यासाठी असे. या अशा लिखाणाला कितीसे साहित्यिकमूल्य असेल हा एक वादाचा मुद्दा आहे उत्तम तंत्र किंवा ताज्या त्रिस्कटासारखी खुसखुशीत वाचनीयता कधीच उत्तम साहित्य होऊ शकत नाही; पण आमचे पुस्तक वाचून, आणखीन एक गोष्ट आपल्या मनावर बिंबते ती म्हणजे मनुष्यप्राण्याची विचित्रता. त्याची unpredictability शब्दात व्यक्तिमत्त्व तर मॉम असं काही उभं करीत असे की कोणत्याही चित्रकाराला लाज वाटावी!

मी सॉमरसेट मॉमची पुस्तके मुंबईच्या उपनगराच्या रोजच्या प्रवासात संपवली. उपनगराच्या प्रवासात गर्दी, श्राम, ढकलाढकली, रेटारेटी व घामट वास विसरण्यासाठी त्यांची फार मदत झाली. सॉमरसेट मॉम एकदा म्हणाले होते, ‘ I am in the very first row of second raters ’; पण मुंबईच्या लयबद्ध लोकलच्या चाकाच्या ‘ कशासाठी पोटासाठी ’ च्या पार्श्वभूमीवर मला मॉम first in the very first row of first raters वाटत असत. ‘ द रेझर्स एज ’ मधील लॅरीसारख्या एखाद्या लक्षणीय पात्राबद्दल वाचून मी बऱ्याच दुपारच्या लंचला टांग मारून मॉमच्या किंवा डिकन्सच्या पुस्तकाचीच लंच घेत असे. अशा तऱ्हेने मॉम व डिकन्सचे एकही पान किंवा पुस्तक स्किप न करता व लंचच्या लंच स्कीप करून मुंबई मोहननगरीचा उपभोग मी घेतला आहे आता मात्र डिकन्सची काही पुस्तके मराठी सिनेमासारखी टिअर जर्कर्स वाटतात व मॉमचा उत्तम वाचनीयतेखाली दडलेला उथळपणा प्रकर्षाने जाणवतो. अगदी अलीकडे मी गेल शिहीचे Passages हे पुस्तक वाचले. त्यात त्या बाईने माणसाचे वय जसजसे वाढते तसतसे वेगवेगळे क्रायसिस (Psychological) कसे येत जातात याचा ऊहापोह केला आहे. आता मागे वळून मी पहातो तो ‘अरे, मला विशीत हीच पुस्तके इतकी आवडली होती का ? ” दयाच्या टप्प्याबरोबर पुस्तक वाचण्याचीही टेस्ट कशी बदलत जाते हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल. याउलट कधीकधी एखादे टारझनचे अॅन्युअल आपल्याला कसे बाल्यावस्थेत फेकून जाते याचा अनुभव बऱ्याच लोकांना आला असेल! असल्या वेळेला पुस्तके टाइममशिनचे कार्य उत्कृष्ट करतात.

गिराल्ड हेक्सटन हा मॉम याचा सेक्रेटरी, दोस्त व लव्हर होता. जेव्हा प्रथम मॉम हेक्स्टनला भेटले तेव्हा मॉम चाळिशीत व हेक्स्टन विशीत होते. हेक्स्टन हा मिशीवाला, मध्यम उंचीचा व तपकिरी केसांचा माणूस होता. त्याच्या चेहऱ्यावर वांग होते. हेक्सटन कमालीचा रागडा दिसे. तो बावदूकही होता. मॉम थोडेसे मख्ख होते. जे गुण आपल्यात नसतात तेच आपल्या जोडीदारात आपल्याला आवडतात. त्यांनीच प्रेमजीवनाचा सतुलितपणा रहात असतो; पण मी हे लग्न जीवनाचे विषयी बोलतो आहे.

–जे. एन्. पोंडा

## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | गुद्दे आणि गुदगुल्या ( ‘ मराठा ’मधील अत्रे यांच्या अग्रलेखाचा संग्रह ) प्रल्हाद केशव अत्रे | रु. ४०/— |
| २. | राइसप्लेट ( विनोदी कथा ) चिं. वि. जोशी | ५/— |
| ३. | कवच ( लेखसंग्रह ) विजया राजाध्यक्ष | १०/— |
| ४. | तो आणि त्याचा मुलगा ( कादंबरी ) ल. ना. केरकर | १५/— |
| ५. | ‘ सफाई ’दार वैताग ( विनोदी कथा ) मालती दामले | १२/— |
| ६. | जिन्दादिल ( मराठी शायरी ) भाऊसाहेब पाटणकर | १०/— |
| ७. | मोवऱ्यात नाव माझो ( कादंबरी ) प्रभाकर द. मराठे | ४५/— |
| 1. | **Rage of Angels** ( Bestseller–Novel ) Sidney Sheldon | |
| 2. | **Solo** ( Thriller ) Jack Higgins | |
| 3. | **Trial Run** ( Racing Thriller ) Dick Francis | |

* ‘ फिनिक्स ’कडे नियतकालिके ( वधू ) पुस्तकाशी ( वराशी ) संलग्न झालेली असतात. परंतु नियतकालिके माहेरी कधीच जात नाहीत! कारण ‘ फिनिक्स ’च्या पुस्तकाच्या बाहुपाशातच त्याना शाश्वती वाटते !

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०

# अधिक चांगल्या चित्रपटांसाठी चळवळ

मुलाखत । विनय सहस्रबुद्धे

कलात्मक आणि दर्जेदार चित्रपटाच्या रसास्वादाची आवड असणाऱ्या प्रेक्षकांना 'फिल्म सोसायटी' ही नवी गोष्ट नाही. मुंबई–पुण्यासारख्या मोठ्या शहरांतून आज या फिल्म सोसायट्या चांगल्या प्रकारे सक्रिय आहेत. महिना–पंधरा दिवसात कुठे-तरी एकत्र येऊन चांगले, दर्जेदार चित्रपट पहाणं, त्यावर अनौपचारिक चर्चा करणं, ठिकठिकाणी होणाऱ्या फिल्मोत्सवातून सहभागी होणं, त्या निमित्तानं विविध भाषी, विदेशी चित्रपटांमधील नव्या वाटांचा मागोवा घेणं इत्यादी अनेक कार्यक्रमांतून या फिल्म सोसायट्या व त्यांचे सदस्य कार्यरत असतात. भारतात हे 'फिल्म सोसायटी' प्रकरण आल्यापासून गेल्या पंचवीस वर्षात या माध्यमातूनच अधिक चांगल्या चित्रपटांसाठी एक नवी, राष्ट्रव्यापी चळवळ हळूहळू आकार घेत आहे. काही प्रांतात 'समांतर चित्रपट' या नावानंही ही चळवळ ओळखली जाते. ही समांतर चळवळ प्रामुख्याने कलात्मक वा दर्जेदार चित्रपटांच्या मोजक्या निर्मात्यांनीच सुरू केलेली असली तरी अशा चित्रपटांना प्रोत्साहन देणाऱ्या फिल्म सोसायट्यांचा त्यात निश्चितच मोठा वाटा आहे.

मुंबईतील फिल्म–फोरम, प्रभात चित्र-मंडळ, सिने सोसायटी, आकृती आणि इंटरनॅशनल फिल्म सोसायटी या पाच फिल्म सोसायट्यांनी एकत्र येऊन आपल्या वतीने 'माध्यम' हे नवे द्वैमासिक अलीकडेच सुरू केले आहे. भारतीय चित्रपटात जी New Movement for Better Cinema सुरू आहे तिचा सविस्तर आढावा प्रेक्षक–वाचकांसमोर ठेवण्यासाठी हे द्वैमासिक सुरू झाले आहे.

'माध्यम'चा पहिलाच, अतिशय देखणा अंक गेल्या महिन्यात बाहेर आला. मुंबईतील जाहिरातव्यवसायातील एक अग्रणी आणि अनेक फिल्म सोसायट्यांशी संबंधित असलेले श्री. वसंत साठे 'माध्यम'चे संपादक आहेत. सर्वश्री पंडित, शिपी व वसंत सोपारकर हे 'माध्यम'चे कार्यकारी संपादक आहेत तर सुधीर नांदगावकर हे प्रबंध–संपादक आहेत. 'माध्यम'चा पहिला अंक वाचनीय तर आहेच; पण प्रेक्षणीयही आहे. यात ताश्कंदच्या फिल्मोत्सवाचे सविस्तर वृत्त, फिल्म सोसायट्यांच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनचे महासचिव श्री. जीन–पिअरे ब्रोसॅर्ड यांची मुलाखत, कानडी, मराठी, तेलगू आणि हिंदी चित्रपटांतील या चळवळीत असणाऱ्या चित्रपटाचा धावता आढावा इ. उल्लेखनीय सामुग्री आहे.

'माध्यम' व या अधिक चांगल्या चित्रपटांसाठीच्या चळवळीबाबत अधिक माहिती मिळवावी या हेतूनेच संपादक श्री. वसंत साठे यांची भेट घेतली. भारतात फिल्म सोसायटीजची चळवळ कशी सुरू झाली याची पार्श्वभूमी सांगताना साठे म्हणाले की, प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर जगात व भारतातही फिल्म सोसायट्यांच्या कामाने मूळ धरले. सत्यजित रे, चिदानंद दासगुप्ता इ. मंडळींनी या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली, परंतु या चळवळीला खरा Break–through मिळाला तो भारतात १९५२ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवामुळे. आत्तापर्यंत जगातील चांगले चित्रपट कोणते, तर अमेरिकन, अशीच भारतीय प्रेक्षकाची धारणा होती. १९५२ च्या महोत्सवामुळे जगात इतर अनेक देशातही अव्वल दर्जाच्या चित्रपटांची निर्मिती होते याची जाणीव आपल्या मंडळींना झाली. विशेषतः डिसिका, रोझालिनी इ. च्या चित्रपटांनी आपली मंडळी प्रभावित झाली. त्यातूनच फिल्म सोसायटी मुव्हमेंटला गती मिळाली. १९५२ च्या सुमारास सबंध देशात हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या फिल्म सोसायट्या होत्या. आज ही संख्या दोनशेपर्यंत गेली आहे!

मुंबईतील फिल्म सोसायट्यांची सुरुवात विजयकर आडनावाच्या एका गृहस्थाने केल्याचे सांगून साठे म्हणाले की, प्रारंभी डॉक्युमेंटरी फिल्म्स बनविणारी अनेक मंडळी या क्षेत्रात आघाडीवर होती. आज मुंबईत सुमारे २५ ते ३० फिल्म सोसायट्या आहेत. 'Better Cinema–ची चळवळ साधारणतः कधीपासून सुरू झाली?' या प्रश्नाला उत्तर देताना श्री. साठे म्हणाले की, १९६० साली प्रदर्शित झालेला 'भुवन शोम' हा या चित्रपट चळवळीतला पहिला चित्रपट! सत्यजित रे, मृणाल सेन हे पहिले दिग्दर्शक! आज पंचवीस वर्षे झाली; पण अद्याप भारतीय चित्रपटांच्या प्रेक्षकवर्गात या चळवळीबाबतचा Sense ज्या प्रमाणात दिसायला हवा त्या प्रमाणात दिसून येत नाही असंही साठे यांनी सांगितलं.

चांगल्या चित्रपटांना प्रोत्साहन देणे हे फिल्म सोसायटीचे कार्य असल्याचे सांगून साठे म्हणाले की, चांगल्या चित्रपटाची सोपी-सरळ व्याख्या म्हणजे 'दिग्दर्शकाचा चित्रपट' चित्रपटनिर्मितीत, निर्मितीतील अन्य कोणत्याही घटकापेक्षा दिग्दर्शकाचा प्रभाव जिथे अधिक जाणवतो, तो दिग्दर्शकाचा चित्रपट. चोमना दुडी, घटश्राद्ध इ. अनेक 'दिग्दर्शकाचे चित्रपट' आहेत व फिल्म सोसायट्यांमुळेच या चित्रपटांना पूर्वप्रसिद्धी व प्रेक्षकवर्ग मिळू शकला.

फिल्म सोसायट्यांनी आयोजिलेले फिल्म-शो सरकारने करमुक्त ठेवले आहेत. शिवाय त्यावर सेन्सॉरची बंधनेही ठेवण्यात आलेली नाहीत; परंतु या दोन सवलती पुरेशा नाहीत असे सांगून श्री. साठे म्हणाले, चित्रपट प्रदर्शित करताना अनंत अडचणी येतात. देश–विदेशातील चांगले दर्जेदार चित्रपट मिळविणे हीही एक मुख्य अडचण आहे. शिवाय मुंबईसारख्या शहरात सामूहिकपणे चित्रपट दाखवायचा तर जागेची समस्या भेडसावते. मुख्यतः या समस्येमुळेच आमच्या चळवळीला प्रेक्षकापर्यंत पोहोचता येत नाही. उलट प्रेक्षकांनाच, अनेक अडचणींना तोंड देऊन

क्षमच्यापर्यंत यावे लागते

'सध्याच्या गल्लाभरू हिंदी चित्रपटांच्या जमान्यात सुजाण, दृष्टी असलेला प्रेक्षकवर्ग तयार करणे हे Better Cinema चळवळी-समोरील एक आव्हान आहे' असेही साठे यांनी सांगितले. 'पण अखेर या चळवळीला मर्यादा आहेत, कारण बहुसंख्य प्रेक्षकांना 'दिग्दर्शकाचे चित्रपट' फारसे आवडत नाहीत, हे खरेच आहे. तेव्हा या Limitations लक्षात घेऊनच ही चळवळ पुढे न्यावी लागेल. स्पर्श, आक्रोश इ. चित्रपटांचे स्वागत झाले त्यावरून आशा वाटण्याजोगीच परिस्थिती असल्याचे दिसते. 'चक्र'सारखा चित्रपट निर्माण होतोय हेही स्वागतार्ह लक्षण आहे. बासू चटर्जीसारखा दिग्दर्शक अशा चळवळीमधूनच पुढे आला आहे. अनेक फिल्म सोसायट्यांनी दर्जेदार चित्रपटांच्या दिग्दर्शकासाठी प्रोत्साहनपर पारितोषिके ठेवली आहेत. मुंबईच्या फिल्म फोरमने ठेवलेल्या दादासाहेब फाळके पारितोषिकामुळे अनेक नवे दिग्दर्शक चमकले व त्यांचे चित्रपटही गाजले' इत्यादी माहितीही साठे यांनी सांगितली.

या चळवळीच्या संदर्भात प्रादेशिक चित्रपटांचे महत्त्व सांगताना साठे म्हणाले की, कोणताही प्रादेशिक चित्रपट हा अधिकाधिक कलात्मक बनविण्यास मोठा वाव असतो. अशा चित्रपटात दिग्दर्शकाला तपशिलाचे बारकावे नीटपणे दाखविता येतात. शिवाय अशा भाविक चित्रपटात अलीकडे English Subtitles दाखवितात, त्यामुळे चित्रपट समजण्याच्या बाबतीतही काही अडचण येत नाही. एका अर्थाने चित्रपटाच्या क्षेत्रात तरी भाषेची बंधने गळून पडली आहेत असे म्हणता येईल.

या चळवळीच्या भवितव्याबाबत श्री. साठे म्हणाले की, हळूहळू छोट्या शहरांपर्यंत ही चळवळ जाऊन पोहोचली आहे. सोलापूर, नागपूर, पुणे, जळगाव, भिलाई, इंदूर, राजकोट इ. अनेक ठिकाणी ही चळवळ गेली आहे. तिथे फिल्म सोसायट्या स्थापन झाल्या आहेत. अर्थात ह्या चळवळीचा प्रसार होत असला तरी त्याचा वेग अतिशय मंद आहे यात शंका नाही. त्यातल्या त्यात दक्षिण भारतात, तुलनेने, ही चळवळ अधिक रुजली आहे. निम्म्याहून अधिक सोसायट्या दक्षिण भारतातच आहेत.

काळाप्रमाणे फिल्म सोसायटीत येणारे प्रेक्षकही बदलत आहेत. आजचा तरुण प्रेक्षक Nostalagia पासून मुक्त आहे तर जुन्यांना त्यातच रमण्यात आनंद आहे. हा पिढी-पिढीतला फरक आहे. जुन्या प्रेक्षकांना आवडणारा 'तुकाराम' हा चित्रपट नव्यांना आवडत नाही; पण 'दुनिया ना माने' बद्दल नव्यांनाही ओढ वाटते. तेव्हा हे पिढी-पिढीतले अंतर लक्षात घेऊनही प्रेक्षकाला एक Perspective देण्याचे कार्य फिल्म सोसायट्यांना करावेच लागणार!

शेवटी, फिल्म सोसायट्यांचे हे Perspective देण्याचे काम अखंड चालणार आहे असे सांगून ते म्हणाले की, चित्रपट जुना झाला तरी प्रेक्षकात सतत नवी भर पडतच राहते. त्यामुळे जुना चित्रपट नव्या प्रेक्षकांना पुन्हा उपलब्ध करून द्यावा लागतो. म्हणूनच हे काम अवरित आहे!

श्री. वसंत साठे गेली जवळपास तीन तपे जाहिरातव्यवसायात आहेत. चित्रपटक्षेत्रात त्यांच्या बॉंबे पब्लिसिटीचे नाव आज सर्वतोमुखी झाले आहे. क्षेवियर्स कॉलेजातून पदवी घेऊन बाहेर पडलेल्या वसंतरावांनी काही काळ उमेदवारी केल्यानंतर जाहिरातीच्याच व्यवसायात स्वतंत्रपणे प्रवेश केला व आज ते तिथेच पाय रोवून उभे आहेत.

श्री. साठे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नातून पुढे चाललेल्या या चळवळीचे महत्त्व मोठे आहे. बाजारू हिंदी चित्रपटाच्या जमान्यात कलापूर्ण चित्रपटांची भूक भागविण्याचे एक प्रभावी 'माध्यम' या चळवळीने उपलब्ध करून दिले आहे. आजकालच्या हिंदी चित्रपटांची बाजारात चलती आहे व ती राहणारच; पण या गदारोळात खऱ्या कलाविष्काराचा शोध जर कुणाला घ्यायचा असेल तर Better Cinema हे त्याला वरदान ठरेल यात शंका नाही. □

## इराक-इराण युद्ध....पृष्ठ २ वरून

लेले आहेत. या हितसंबंधाना धोका निर्माण होईल असे परिणाम या संघर्षाचे होऊ नयेत याकडे त्याचे लक्ष राहीलच. रशियाने अफगाणिस्तानात लष्करी हस्तक्षेप केला तेव्हा रशियाला येथेच रोखले पाहिजे नाही तर इराणच्या आखातावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी तो पुढची हालचाल करील अशी भीती अमेरिकेला वाटू लागली आणि रशियाचा असा काही उद्देश असेल तर आम्ही तो सफल होऊ देणार नाही असा इशारा अध्यक्ष कार्टर यांनी दिला. इराणच्या आखातातून आपली तेलवाहतूक सुरक्षित राखण्यासाठी अमेरिकेने त्या भागात आपले आरमारी सामर्थ्यही वाढविले; पण आता इराकमार्फत रशिया या टापूत आपला प्रभाव वाढविण्याच्या दृष्टीने हालचाली करीत आहे असे दिसते. इराकला रशियाने मोठ्या प्रमाणावर शस्त्रमदत केलेली आहे. आपण रशियाच्या प्रभावाखाली नाही, आपले धोरण स्वतंत्र आहे अशी अरब राष्ट्रात स्वतःबद्दल प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न सद्दाम हुसेन गेली काही वर्षे करीत आहेत व आपला प्रभाव उघड न दिसणेच चांगले असे रशियाही वाटत असून इराकशी त्या दृष्टीनेच संबंध इराणने ठेवले आहेत. अरब राष्ट्रांवर इराकचा प्रभाव वाढत गेला तर अप्रत्यक्षपणे रशियाचाही प्रभाव वाढेल. अर्थात आपला प्रभाव टिकविण्यासाठी अमेरिकाही हालचाली करीलच. सौदीअरेबिया अमेरिकेचा मित्र आहे. इराकचे बळ फार वाढू नये यासाठी सौदीअरेबियामार्फत त्याला शह देण्याचे अमेरिकेचे प्रयत्न राहतील; पण इराणच्या आखातालगतचा देश म्हणून इराकला जे मोक्याचे स्थान आहे ते सौदीअरेबियाला नाही. इराणला ते स्थान होते तेव्हा इराणमध्ये क्रांती घडवून तेथे आपल्याला अनुकूल राजवट आणण्याचा प्रयत्न अमेरिका करण्याचो शक्यता आहे. सध्याच्या युद्धाचा एक परिणाम म्हणून तेथील खोमेनीची राजवट उलथली जाण्याचाही संभव आहे. इराकचे तसे प्रयत्न आहेतच. इराणमध्ये आपल्या बाजूची राजवट आणण्याच्या दृष्टीने रशियाही हालचाली करण्याचा संभव आहे. पश्चिम आशियातील या स्फोटक क्षेत्रात नवा सत्तासमतोल निर्माण होतो की अस्थिरता वाढते हे येत्या काही महिन्यात स्पष्ट होईल. □

# चित्रपट

सदानंद बोरसे

# सौभाग्यदान

## तीच रुळलेली कथा, तीच मळलेली वाट

'ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा'-मधील स्वप्नामधले एक गाव म्हणजे जिगरवाडी. त्या वाडीचा पाटील म्हणजे (दत्ता भट) हा एक मध्यमवर्गीय (म्हणजे प्रेमळ, सालस वगैरे) पाटील. त्याला गावात वडिलकीचा मान असला तरी त्याचा दरारा वगैरे काहीच नाही. मुख्य म्हणजे मोठा चौसोपी वाडा, त्याच्या ओरसचोरस ओसरीवर करकरणारा झोपाळा आणि भिंतीवर टांगलेली डबलबारी बंदूक हे नेहमीच्या परिचयाचे दृश्य या पाटलाच्या बाबतीत दिसत नाही. परस्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहणे सोडाच; पण तमाशा, नाच-गाणी असले छंदफंद किंवा शोकसुद्धा या पाटलाच्या वाऱ्याला फिरकत नाहीत. थांबा, थांबा, तो आश्चर्याने वासलेला 'आ' मिटा. या जिगरवाडीत अशा आश्चर्यजनक वस्तू बऱ्याच आहेत. पानिपतच्या युद्धात या गावातील घरटी एकेक गडी कामी आल्याने जिगरबाज शूरवीर मर्दांची वाडी म्हणून या गावाला 'जिगरवाडी' नाव पडले. सध्या मात्र गावचा एकच गडी सैन्यात आहे-त्याचे नाव अर्जुन घोरपडे. (यशवंत दत्त) (आडनाव घोरपडे म्हणून तो लगेच संताजी घोरपडेचा वंशज. जर जाधव असते तर धनाजी जाधव त्याच्या पाठीशी उभा राहिला असता, मालुसरे की लगेच तानाजी मालुसरे.) अर्जुनचा पिढिजात सैनिकी पेशा. अर्जुन हा सावित्रीचा पती. (खरे म्हणजे या ठिकाणी अर्जुनचे नाव सत्यवान किंवा सावित्रीचे नाव द्रौपदी असायला हवे होते.) म्हणजे पर्यायाने सावित्रीचे कुंकू किंवा सावित्रीचे सौभाग्य. गरोदर सावित्री प्रसूत होण्याच्या निमित्ताने जिगरवाडीत एक डॉक्टर (डॉ. श्रीराम लागू) येतो. वरकरणी एक आश्रम चालवून त्या आश्रमातील निराधार मुलींना कुंटणखान्यात नेऊन धंद्याला लावणाऱ्या एका दादाला डॉक्टरने पकडून दिलेले असते. (हा दादा म्हणजे आपल्या निळू फुलेंचा हाः हाः हाः खलनायक!) त्यानिमित्त डॉक्टरच्या बायकोला (पहा-पाहुण्या कलाकार जयश्री गडकर) आणि मुलीला दादाने म्हणजे त्याच्या चमच्याने-संभ्याने जाळून टाकलेले असते. त्या घटनेमुळे प्रक्षुब्ध झालेला डॉक्टर जिगरवाडीत येऊन स्थिरावतो. तेथील माणसांच्या मायेने परत माणसात येतो. (जिगरवाडीत डॉक्टर नसला तरी कोणत्या तरी शहराची लोकल ट्रॅन्स्पोर्टची गाडी मात्र जिगरवाडीला अधूनमधून भेट देते.) तर पुढे अर्जुन एका युद्धात कामी आल्याची तार येते. सावित्री विधवा होते. पुढे तिचे हाल, गावकऱ्यांकडून तिला मिळालेला आधार आणि तिने स्वाभिमानाने आपल्या मुलीला-फुलवाला (बेबी राखी) वाढविणे हे चक्र ओघाने आलेच. दरम्यानच्या काळात दादा तुरुंगातून सुटून आलेला. हा दादा प्रतिपरमेश्वराप्रमाणे सर्वज्ञ असतो. डॉक्टरच्या ठावठिकाण्यापासून ते कॉलऱ्याच्या साथीवरील औषधापर्यंत कोणतीही गोष्ट त्याला कळते. या सर्वज्ञपणामुळे आणि स्वतः आदर्श खलनायक असल्यामुळे तो संकटांचे रोरावणारे, घोंघावणारे, गरजणारे आणि बरेच काही करणारे काळेकभिन्न-कुट्टमिट्ट ढग डॉक्टरांच्या अंगावर लोटतो; पण अखेर सत्याच्या वाऱ्याने ते ढग वितळून जातात आणि अर्जुनला वाचविण्यासाठी डॉक्टर दादाचा खून स्वतःच्या माथी घेऊन सावित्रीला सौभाग्यदान करतात. (बाय द वे, दरम्यानच्या काळात अर्जुन मेलेला नसून जिवंत आहे, असा एक अपेक्षित अचानक शोध चित्रपटात लागतो.)

अरे हो! आणखी एक विसरलोच. या जिगरवाडीत सुलेमान (अशोक सराफ) नामे एक भोळा-भाबडा अर्जुनचा दोस्तही आहे. (हा चित्रपट मोरादाबाद, अलीगड इत्यादी ठिकाणी दाखवल्यास जातीय दंगली एकदम शांत होऊन हिंदू-मुसलमान गळ्यात गळे घालून एका ताटात पुरणपोळी-आळूची भाजी आणि शिरखुरमा मुर्गी खाऊ लागतील! शासनाने या उपायाचा अवश्य विचार करावा.) या सुलेमानाचेही सलमा नामक तरुणीवर प्यार-म्होब्बत-अिशक वगैरे बसलेले आहे. कोंबड्याप्रमाणे 'कुकूच ऽऽकू' ओरडणे, अंडा-हुंडा अशा कोट्या करणे इत्यादी विनोद (?) करण्यापासून ते पुढे कॉलऱ्याच्या साथीत सलमा मेल्यानंतर शोक वगैरे व्यक्त करून त्या विनोदी सदऱ्याला कारुण्याची कॉलर लावण्यापर्यंत हरकामे हा सुलेमान करतो. मध्येच एकदा वेळ मिळाल्यानंतर 'दुनिया तो चाहे ना चाहे, होता वही जो खुदा चाहे' अशी एक ब्येस कव्वाली म्हणून नाचवीचही करतो!

आपल्या 'थँक्यू मिस्टर ग्लाड'मुळे प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात आलेल्या अनिल बर्व्यांनी 'सौभाग्यदान'ची कथा लिहिली

आहे. एकूण कथेतील प्रसंगांमध्ये 'नाट्यपूर्ण कलाटणी मिळणे' हा प्रकार विशेषतः शेवटी शेवटी तर इतका वापरला आहे की, त्या वेळी प्रेक्षक बिचारा फक्त कोलांट्याच खात असतो. डॉक्टरचे घर जळून जाते, त्याच दिवशी विमनस्कपणे गाडीतून भरकटत असताना सावित्रीची किंकाळी त्याला थाऱ्यावर आणते. पुढे दादाच्या फंदात पडून नकळत सुलेमान नकली अिंजेक्शनच्या बाटल्या डॉक्टरांना देतो; पण तेच अिंजेक्शन त्याच्या सलमाचा जीव घेते किंवा मुलीच्या बारश्याच्या दिवशीच अर्जुन युद्धात मारला गेल्याची तार येते. अशा प्रसंगांची एक मोठी यादीच देता येईल. कथेत न पटण्यासारख्या गोष्टीही बऱ्याच. उदाहरणार्थ-१ आपल्या आश्रमातील एका मुलीला (अर्थातच तिला एकदा कोठीवर नेल्यानंतर) दिवस गेल्यानंतर दादा तिचा गर्भपात घडविण्यासाठी तिला डॉक्टरांकडे आणतो. कशाला आणील? 'आयला, गेले तर गेले दिवस. गेलेले दिवस का परत येतात ? मला काय घेणंदेणं आहे ? ' असा विचार तो का नाही करीत? आतापर्यंत नेलेल्या कित्येक मुलींच्या बाबतीत हा प्रकार घडलेला असेल, मग याच मुलीला का आणतो ? आणतो तर आणतो, अशा कामाला तो ओळखीच्या डॉक्टराचा – जे आश्रमाचे आश्रयदातेही आहेत– वापर कसा करील ? २) जिगरवाडी हे अतिशय छोटे गाव. प्रत्येक माणूस दुसऱ्याला ओळखतो. अशा वेळी गावी परतणारा अर्जुन अनोळखी संध्या आणि दादाच्या बोलण्यावर विश्वास ठेवील? असो; पण अशा गोष्टींचा विचार न करता सर्वभावसमावेशक कथा पाडायचीच असे ठरवून बर्व्यांनी आपली कामगिरी उरकली आहे.

चित्रपटाची पटकथा अनिल बर्वे आणि व्ही. रवींद्र यांची आहे. पटकथेची रचना मात्र सुरुवातीला बरीच बांधीव झाली आहे. विशेषत. डॉक्टरांच्या पूर्वायुष्याचे फ्लॅश-बॅक चागलेच चपखल बसले आहेत. नंतर मात्र प्रसंग, त्याचे गुंते आणि सोडवणूक याच्या भाऊगर्दीत पटकथा वेगवान वगैरे बनण्याऐवजी उरकली जाते.

चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत व्ही. रवींद्र. वस्ताद व्ही. शांतारामांच्या तालमीत तयार झालेला हा पठ्ठा आहे, असे पार सुरुवातीच्या श्रेयनामावलीपासून सतत जाणवते. सुरुवातीला पाटावर कुंकवाचा करंडा ठेवल्यानंतर त्या ठिकाणी ताबडतोब अक्षरात 'सौभाग्यदान' हे नाव, रेल्वेच्या डब्याचे दार बंद होऊन त्यावर 'मध्यांतर' हा मजकूर झळकणे, अर्जुनच्या मरणाची बातमी कळल्यानंतर डेक्कन क्वीनच्या गतीने खाली-वर हिंदकळणारा तराजू, आसऱ्याचे छप्पर उडाले हे अक्षरशः खरे करण्यासाठी घराचे निखळणारे पत्रे इत्यादी, इत्यादी आणि इत्यादी बऱ्याच गोष्टी सांगता येतील. (यात काही वेळा त्यांनी चांगलेही नमुने दिले आहेत. उदाहरणार्थ– घर जळल्याच्या दुःखाने दिशाहीन झालेल्या डॉक्टरला थांबवणाऱ्या अर्जुनाच्या हातातील पेटत्या चुडाचे मोटारीच्या काचेत भगभगणारे प्रतिबिंब. संध्याकाळी शेकोटी पेटताना सुरू झालेल्या गप्पा, त्यात डॉक्टरानी सागितलेली पूर्वकहाणी आणि तो फ्लॅशबॅक संपताना सारेजण पांगलेले, शेकोटी विझून गेलेली.) 'डायरेक्शऽऽनचे असे खिळे ठोकताना काही किरकोळ गोष्टींकडे रवींद्राचे दुर्लक्ष झाले. जिगरवाडीत टपकणाऱ्या शहरी वाहतूकगाडीचा उल्लेख यापूर्वी केला आहेच. रेडिओवर 'शेवटी काही ठळक बातम्या.' म्हटल्यानंतरही बराच वेळ बातम्या चालू राहणे आणि त्याही सविस्तर बातम्यांच्या स्वरूपात ऐकू येत राहणे हे फक्त आकाशवाणी जिगरवाडीलाच शक्य आहे. अर्जुन युद्धावर जाताना त्याची तान्ही मुलगी मोठी होऊन शाळेत जाणे, तिचा पहिलीत पहिला नंबर येणे आणि दरम्यान चारच वर्षांचा काळ उलटलेला असणे हे वयाचे गणित कुठे तरी चुकत होते. जिगरवाडीत होणाऱ्या सकाळ–संध्याकाळी आणि त्या वेळी लोकांच्या पडणाऱ्या सावल्यांची दिशा यामुळेही कधीमधी मी घोळात सापडत होतो.

बहुतेक सगळ्याच कलाकारांची सुंदर कामे आणि सवाद या 'सौभाग्यदान'च्या जमेच्या बाजू. सावित्रीची भूमिका संगीता या नव्या अभिनेत्रीने केली आहे. संवादामध्ये काही ठिकाणी अति–अलंकारिक नाटकी वाक्ये आहेत; विशेषतः डॉ. लागूंच्या वाट्याला अशी वाक्ये अधिक; पण त्यांनी आणि इतरही कलाकारानी ती अशा सहज रीतीने टाकली आहेत की त्या वाक्यांमधील नाटकीपणा निघून जाऊन तो बहुतेक प्रसंगांमध्ये चपखल बसून जातात.

चित्रपटाची गीते जगदीश खेबूडकर आणि सुधीर मोघे याची, तर संगीत राम कदम याचे. चित्रपटातील काही मोजक्या जागा वगळता छायाचित्रण हा भाग डोळ्यांना त्रासच देत होता.

तर अशा या स्वप्नामधील गावच्या स्वप्नामधील आदर्श माणसाची तीन रुळलेली कथा त्याच मळलेल्या वाटेवरून सादर करणारा 'सौभाग्यदान!'

*

## फिर वही रात

### अनेक जुने तुकडे सांधलेला खिळखिळा सांगाडा

एका तरुणीची पावले. ती पुढे पुढे पडताहेत. (मग कॅमेरा तिच्या चेहऱ्यावर.) ती तरुणी दिसायला सुंदर, घाबरलेली. (मागे एव्हाना सस्पेन्स म्युझिक सुरू झालेले आणि अधिकाधिक कल्लोळी व्हायला लागलेले. यातच चित्रपटाची टायटल्सही मधून मधून येत असलेली. कधी कॅमेरा तरुणीच्या मागे, कधी पुढे, कधी दूर, कधी जवळ असा नाचतोय.) त्रिकोणी दगडी कमानींमागून कमानी ओलांडत ती तरुणी चालतीये, चालतीये. (टायटल्स अर्थात सर्व नावे संपल्यानंतर) ती एका कडी लावलेल्या बंद दारापाशी येऊन थबकली. करकरत तिने दार उघडले. ती आत शिरली. आत एक काळे कपडे घातलेली, केसांच्या जटा झालेली स्त्री ती वळते. (अरे, ही तर आपली शशिकला!) डोळे वटारत, हडकुळी बोटे चमत्कारिक वाकडीतिकडी करीत आणि चेहरा शक्य तेवढा भेसूर करीत ती त्या तरुणीला 'आवो, आवो' म्हणते. तरी ती जवळ येत नाही, म्हटल्यावर स्वतःच हात पसरून तिच्या दिशेला जाऊ लागते. तरुणी भीतीने पळण्यासाठी वळते, तर दार बंद झालेले. ती दरवाजा ठोठावून दार उघडण्याबद्दल ओरडत असतानाच त्या स्त्रीची बोटे तिच्या गळ्यावर पकड ठेवतात आणि 'आऽऽऽऽ' अशी एक किंचाळी फोडून–(ही किंकाळी कर्णकर्कश असून हा सारा प्रकार श्वास रोखावयास लावणारा, अंगावर केस उभे करणारा, मेंदूला मुंग्या आणणारा, रक्त गोठविणारा आणि आणखी

बरेच काही करावयास लावणारा आहे, असे 'फिर वही रात' या चित्रपटाच्या जाहिरातकारांचे म्हणणे आहे. त्यावरून हा चित्रपट रहस्यमय वगैरे आहे, हा अंदाज एव्हाना बांधता येतोच.)

—तर तशी एक किंचाळी फोडून आशा (म्हणजे आपली ती सुंदर तरुणी अर्थात नवतारका किम.) एकदम पलगावर उठून बसली. (आणि पडद्यामागून दिग्दर्शकाचे एक 'कैसे फँसाया! हः हः' हास्य ऐकू आले. खरे म्हणजे हे स्वप्न असणार, हे प्रेक्षकाने आधीच ओळखलेले असते.) रोज रात्री आशाला असे स्वप्न का पडते या प्रश्नापासून सुरू झालेले रहस्य एक धुराने वेढलेली हवेली, एक मेणबत्ती घेऊन फिरणारी, चेहऱ्यावर जखमेचा वण असलेली बाई, रात्री ऐकू येणारे, 'बिंदिया चमके' हे गाणे, माळघाची रहस्यमय मुलगी, एक काळे माजर इत्यादी नेहमीची रहस्यमय बुजगावणी उभी करून (संदर्भासाठी आठवा—अनुक्रमे—बीस साल बादपासून खंजरपर्यंतचा कोणताही रहस्यपट, वह कौन थी, पुन्हा बीस साल बादपासून खजरपर्यंतचा कोणताही रहस्यपट, महल, रेड रोज इत्यादी) आणि अर्थातच खऱ्या कारणीभूत व्यक्ती या अत्यंत साध्याभोळ्या आणि ज्याचा या रहस्याशी काडीमात्रही संबंध नाही अशा व्यक्तीभोवती संशयाचा गुंता ही नेहमीची 'हमखास यशस्वी' युक्ती वापरून दोन-चार खून पाडत संपते. मध्येच दोन-तीन वेळा पहिल्यासारखी 'कैसे फँसाया' स्वप्नेही आहेत.

चित्रपटाचे निर्माते एन. एन. सिप्पी यानी चित्रपटाचे दिग्दर्शन अभिनेता डॅनी डेंझोंपाकडे सोपविले होते. दिग्दर्शक म्हणून डॅनीचा हा पहिला चित्रपट. चित्रपट करण्याआधी सिप्पीसाहेबांनी स्वतः यापूर्वी निर्मिलेले वह कौन थी, गुमनाम हे चित्रपट आणि इतरही देशी-विदेशी रहस्यपट डॅनीला नीट दाखविले आणि डॅनीनेही ते बरेच लक्षपूर्वक पाहिले असावेत. त्यामुळेच प्रचंड जायदाद, तिच्या मालकीसाठी वेगवेगळ्या उपायानी तिच्या एकुलत्या एक मालकिणीला वेडी बनविण्यासाठी चाललेले प्रयत्न इत्यादी इत्यादी (यातील बरेच इत्यादी आधी सांगितले आहेतच.) चीजवस्तूंनी आणि अर्थातच नाच, गाणी, विनोद इत्यादी आवश्यक स्थावरजंगम मालमत्तेने युक्त अशी कथावास्तू डॅनीने ध्रुव चटर्जीकडून बांधून घेतली. यापूर्वी पडद्यावर येऊन गेलेल्याच गोष्टी क्रमही न बदलता परत सादर करायच्या असल्यामुळे डॅनीचे दिग्दर्शक म्हणून काम फारच सोपे होते. तरीसुद्धा नाच, गाणी, जगदीप आणि सोनेरी टोळीचे काही 'छ' दर्जाचे विनोद (या कंपूलासुद्धा एक गाणे आहे.) आणि सर्वांत शेवटी नायक-खलनायकाची एक जोरदार आणि अर्थातच निष्कारण झुंज (हा शेवटचा अपवाद वगळता मारामारी हा प्रकार संपूर्ण चित्रपटभर डॅनीने टाळला आहे.) या अनावश्यक गोष्टी संपूर्ण चित्रपटात पेरून डॅनीने संपूर्ण चित्रपट बराच संथ आणि रटाळ बनवून टाकला आहे जवळपास सर्वच हिंदी चित्रपटांमधून 'रहस्य' नामक पदार्थ चवीपुरता वापरलेला असतोच. त्यातच डबल रोल, ते नसेल तर मुखवटा, ते नसेल तर तर काही यांत्रिक करामती अशा ठराविक कल्पनांनी निखळ रहस्यपट हिंदीमध्ये अतिशय ठराविक साच्याचे असतात. चार—पाच या चाकोरीतील चित्रपट पाहिल्यानंतर कोणीही सामान्य प्रेक्षक ओळखू शकेल अशा त्याच त्या ढोबळ रहस्यामुळे हिंदी रहस्यपटांच्या भाऊगर्दीत बऱ्यापैकी दर्जेदार रहस्यपट (उदाहरणार्थ—कानून, वह कौन थी, ज्वेलथीफ, तीसरी मंझिल, चोर चोर, इत्तफाक, बेनाम आणि अगदी अलीकडचा अलीकडचा म्हणजे इकरार) अक्षरशः हाताच्या बोटावर मोजण्याइतके सापडतील. बाकी बहुतेक हिंदी रहस्यपट म्हणजे याच चित्रपटाचे वेगवेगळे तुकडे सांधून उभे केलेले डुगडुगते सांगाडे असतात. तर 'फिर वही रात.' ही असाच एक जर त्यातील अनावश्यक भागाला योग्य कात्री लावण्याचा विधायक उद्योग नीट पार पाडला असता तर चित्रपटाचा जुनाटपणा कायम राहून सुद्धा वेगवान मांडणीमुळे तो बऱ्यापैकी पकड घेणारा ठरला असता; पण इधरच डॅनीने मार खाया है।

डॅनी या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनक्षेत्रात उतरला, त्याबरोबरच किम ही काही कोनांमधून (विशेषतः उजव्या profile ने) डिंपलसारखी (हुंऽऽ-हा सुस्कारा 'बॉबी'-साठी) दिसणारी नवी अभिनेत्री नायिका म्हणून पडद्यावर आली आहे. दिसायला छान असणे आणि संपूर्ण चित्रपटात निरनिराळ्या छान कपड्यांमध्ये वावरण्याबरोबर तिने कामही ठीक केले आहे, हे विशेष! बाकी राजेश खन्ना काही दृश्यांमध्ये सुसह्य असतो तर काही ठिकाणी त्याच्या विशिष्ट बोलण्याच्या आणि हातवाऱ्याच्या लकबीमुळे वात आणतो! अरुणा इराणी आणि डॅनीही उल्लेखनीय. जगदीप, मुक्री इत्यादी विनोदाच्या खादेकऱ्यांबद्दल काय लिहिणार? बाबांनो, आम्ही हसतो, पण तुमचे विनोद नकोत रे!

चित्रपटाची गीते मजरूह आणि संगीत राहुलदेव बर्मनचे. राहुलदेव बर्मनने चित्रपटातील दोन—तीन गीते (विशेषतः एक लता व किशोरचे द्वंद्वगीत) बरी दिली आहेत; पण त्याची सगळी कसर पार्श्वसंगीतात भरून काढली आहे. जितका वाद्यांचा कर्कश गदारोळ जास्त तितकी प्रेक्षकाला वाटणारी भीती अथवा त्याच्या मनावर पडणारा ताण अधिक हे जे घाणेरडे समीकरण हिंदी चित्रसृष्टीत दृढमूल आहे त्याला जागून चित्रपटात तीनचतुर्थांश वेळ फक्त पार्श्वसंगीत ऐकू येते. बरं, ते तरी धड द्यावे की नाही? बर्मनांच्या राहुलने तेही फारसे मनावर घेतलेले नाही. 'हाःऽ' 'हाऽ' असे ओरडत एखाद्याने बरीच वाद्ये एकमेकावर जोरजोरात आपटल्यानंतर जो गोंधळमेळ तयार होईल तो म्हणजे 'फिर वही रात'चे पार्श्वसंगीत!

चित्रपटाचे छायाचित्रकार सुदर्शन नाग. थरथरणाऱ्या चौकटी, दृश्य प्रकाश आणि सावल्याचा न बसणारा मेळ यामुळे आवश्यक ती पकड घेणारी उत्कंठावर्धक रहस्यमयता उभी करण्यास कॅमेरा भयंकर कमी पडला. शिवाय हलते झुंबर, एक म्हशीचा मुखवटा, एक लालसर प्रकाशाने भरलेली खोली, चौकटीत लवलवणारे तेच कृश हात, वादळी रात्री होणारा विजांचा चमचमाट अशा जुन्याच युक्त्यांच्या आयत्या पीठावर या नागोबांनी ठाण मांडले. शेवटी दाखविलेला गोळीबार म्हणजे तर विनोदी चित्रणाचा अव्वल नमुना आहे! त्या प्रसंगी थोडे अधिक लक्ष दिले असते तर बहुतेक सर्व फटाक्यांवरील लक्ष्मी छाप किंवा कॅप्टन छाप आणि शिवकांचीच्या नावाची लेबलेसुद्धा दिसली असती!

तर अशा रीतीने सर्व जुनाच पसारा मांडून डॅनीने हा फिर वही कैसे फँसाया सादर केला आहे. ☐

" Start where You are,
With what You have.
Make Something of it
Never be satisfied. "

*–G. W. Carver*

गेल्या वर्षीच्या माणूस दिवाळी अंकात आलेली–गाजलेली चरित्र कहाणी

# एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गव्हाणकर

यंदाच्या दिवाळीनंतर लवकरच पुस्तकरूपात प्रसिद्ध होत आहे.

राजहंस प्रकाशन
पुणे